जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## शब्दांच्या पलीकडले...

जुनी नाती जशी एकमेकांना अनेक वर्षात भेटलो नाही तर विस्मरणात जातात तसे जुने शब्दही विस्मरणात जातात. त्यांच्या शरीरानं नव्हे तर त्यांच्या आत्म्यानं. शब्दालाही आत्मा असतो, मन असतं, शरीर असतं, प्रतिष्ठा असते, गौरव असतो आणि महत्त्वाचं म्हणजे स्वाभिमानही असतो असा साक्षात्कार वाटतो. त्यांनाही जन्म आहे, मृत्यू आहे, पुनर्जन्म आहे, चिरंजीवित्वही आहे महर्षी व्यासांसारखं.

समन्वय, नित्यपरिचयाचा आणि विविध क्षेत्रात, कोणत्या ना कोणत्या कारणानं अनेकदा प्रयोगात येणारा शब्द. बोलायला सोपा म्हणूनच काटेकोर अर्थ माहीत नसलेला शब्द. आज जेव्हा हे अनेक वर्षांपूर्वीच जनजीवन जवळून बघते आहे, अभ्यासते आहे आणि कल्पनेत का होईना पण अनुभवते आहे तेव्हा समन्वय, समन्वयवादी भूमिका किंवा समन्वयाचे विचार यासारख्या संज्ञांशी पुन्हा नव्यानं परिचित होत आहे.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

कृष्णद्वैपायन–महर्षी वेदव्यास या वाचनीय पुस्तकात लेखिका डॉ. भारती सुदामे यांनी वरीलप्रमाणे अनेक छान विचार मांडलेत.



शब्द हेच संवादाचे सर्वात सुंदर व प्रभावी साधन आहे. ते जोडतात अन् तोडतातही. शब्दांच्या गर्भितार्थातून जीवनाच्या प्रवासाला सार्थकता प्राप्त होऊ शकते. तेव्हाच कळते, अनुभवता येते... शब्दांवाचून कळले सारे... शब्दांच्या पलीकडले...

# बिबट्याच्या हल्ल्यात शाळकरी मुलीचा मृत्यू

नगर – पारनेर तालुक्यातील खडकवाडीतील रोकडे वस्तीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता तिसरीत शिकणारी कु. ईश्वरी पांडुरंग रोहकले हिचा राहत्या घराजवळ बिबट्याने केलेल्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला. १६ जानेवारीला सायंकाळी ७.१५ च्या सुमारास ही घटना घडली.



कु. ईश्वरी रोहोकले

ईश्वरीचे वडील पांडुरंग रोहकले सायंकाळी ७ वाजता घरासमोरील पडवीमध्ये जेवण करत होते. त्यावेळी मुलगी ईश्वरी हिने घराबाहेर लघुशंकेसाठी जात असल्याचे सांगितले. त्याचवेळी घराच्या शेजारी मका पिकात दबा धरून बसलेल्या बिबट्याने मुलीवर हल्ला केला. तिला थेट मक्याच्या शेतामध्ये ओढत नेले. तिने आरडाओरड केली. पडवीत बसलेल्या वडिलांनी तिचा आवाज ऐकला. त्यांनी मक्याच्या शेतात बॅटरी लावून पाहिले.

नरभक्षक बिबट्या तिच्याजवळ आढळून आला. वडिलांनी बिबट्याचा प्रतिकार करत तिची सुटका केली. त्यानंतर बिबट्या पळून गेला. हल्ल्यात मुलगी गंभीर जखमी झाल्याने तिला टाकळी ढोकेश्वर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तेथे गेल्यानंतर डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या प्रकरणी पारनेर पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# नगर परिसरात बिबट्याचा बछडा अडकला पिंजऱ्यात

**अजूनही नर, मादी बिबट्यासह २ बछड्यांचा परिसरात वावर, वनविभागाने लावले पुन्हा २ पिंजरे**

नगर – नगर तालुक्यातील भोरवाडी गावच्या परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून वावर असलेल्या ५ बिबट्यांच्या पैकी एक बिबट्या वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात १५ जानेवारीला रात्री जेरबंद झाला आहे. जेरबंद झालेला बिबट्याचा अंदाजे दीड वर्षांचा बछडा असून अजूनही या परिसरात नर, मादी बिबट्यासह २ बछड्यांचा वावर असल्याचे वनविभागाने लावलेल्या ट्रॅप कॅमेऱ्यात दिसून आले आहे, त्यामुळे वन विभागाने १७ जानेवारीला दुपारी आणखी २ पिंजरे या परिसरात लावले आहेत.

नगर तालुक्यातील भोरवाडी शिवारात भोरवाडी ते चास रस्त्यावर असलेल्या डोंगराच्या कडेला मागील दीड वर्षापासून बिबट्या वेळोवेळी नागरिकांच्या निदर्शनास येत आहे. तीन बिबटे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. बिबट्यांचा वावर वाढल्याने नागरिक दहशतीखाली वावरत असून, वनविभागाने बिबट्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी होत होती. त्यामुळे वन विभागाने या परिसरात ट्रॅप कॅमेरे लावले. वनविभागासह वन्यजीव अभ्यासक हर्षद कटारिया व त्यांचे सहकारी नितेश पटेल, गौरव मुळे, सचिन क्षीरसागर यांनी गेले अनेक दिवस बारकाईने अभ्यास केल्यावर या ठिकाणी एक नर, एक मादी व त्यांचे साधारणतः दीड वर्षापूर्वी जन्मलेले ३ बछडे असे एकूण ५ बिबटे या परिसरात असल्याचे स्पष्ट झाले.

### अन्य वन्य प्राण्यांच्या वावरामुळे बिबट्यांना मिळते भक्ष

या परिसरात ५ बिबटे असले तरी त्यांनी अद्याप एकदाही मानवावर अथवा पाळीव प्राण्यांवर हल्ला केलेला नाही. या परिसरात ससे, हरीण, मुंगुस, रानडुकरे, भटके कुत्रे अशा वन्य प्राण्यांचा मोठ्या प्रमाणावर वावर आहे. त्यामुळे या बिबट्यांना आयते भक्ष मिळत असल्याने त्यांनी या परिसरातच गेल्या वर्ष दीड वर्षापासून मुक्काम ठोकलेला असावा असा वन विभागाचा अंदाज आहे.



भोरवाडी (ता.नगर) शिवारात वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाल्यानंतर त्याची पाहणी करताना वनपरिक्षेत्र अधिकारी हरी सरोदे, नव्याने रुजू झालेले वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे, वनपाल शैलेश बडदे, वनरक्षक गायकवाड, वनकर्मचारी सखाराम येणारे, योगेश चव्हाण वन्यजीव अभ्यासक हर्षद कटारिया व ग्रामस्थ.

### तरस आणि २ बिबट्यांमध्ये झाली झुंज

या परिसरात इतर वन्य प्राण्यांबरोबरच तरसाचे ही वास्तव्य आहे. २ जानेवारीला रात्री तर एका तरसाची आणि या ठिकाणी असलेल्या २ बिबट्यांची झुंज झाली होती. यावेळी एका तरसाने २ बिबट्यांना पळवून लावल्याचे वनविभागाच्या ट्रॅप कॅमेऱ्यात वन्यजीव अभ्यासकांच्या टीमला दिसून आले होते.

### एक बिबट्या अडकला एक पळाला

या परिसरातील बिबट्यांच्या हालचालीवर वन्यजीव अभ्यासकांचे बारकाईने लक्ष होते. त्यातच ग्रामस्थांच्या मागणीनुसार ग्रामपंचायत सदस्य राहुल जाधव यांनी मागील आठवड्यात वनविभागाला निवेदन देवून बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्याची मागणी केली. वनविभागाला पत्र व्यवहार झाल्यानंतर वनविभागाच्या मार्गदर्शनाखली ग्रामस्थ राजेंद्र हरिभाऊ भोर यांनी स्वखर्चाने बिबटयाचे वास्तव्य जेथे आहे, तिथपर्यंत रस्ता बनवून पिंजरा तिथपर्यंत नेण्यात आला.बिबटया पकडण्यासाठी त्या पिंजऱ्यात भक्ष ठेवण्यात आले होते. त्या भक्षाची खाण्या पिण्याची जबाबदारी शुभम भोर यांनी घेतली होती. ग्रा. पं. सदस्य दिपक भोर, दत्ता भोर, गणेश भोर, प्रतीक भोर, योगेश पानसरे, सोमनाथ भोर आदी ग्रामस्थानी त्यास सहाय्य केले. अखेर १५ जानेवारीला रात्रीच्या वेळी पिंजरा लावला तेथे २ बिबटे आले. त्यातील एक पिंजऱ्यात अडकला तर एक तेथून पळून गेला.

### पकडलेला बिबट्याला सोडले जंगलात

१६ जानेवारीला वनपरिक्षेत्र अधिकारी हरी सरोदे, नव्याने रुजू झालेले वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे, वनपाल शैलेश बडदे, वनरक्षक गायकवाड, वनकर्मचारी सखाराम येणारे, योगेश चव्हाण वन्यजीव अभ्यासक हर्षद कटारिया व त्यांचे सहकारी नितेश पटेल, गौरव मुळे, सचिन क्षीरसागर आदींनी त्या ठिकाणी भेट देवून पिंजऱ्यात अडकलेल्या बिबट्याला जंगलात नेवून निसर्गात मुक्त केले.

आता या परिसरात राहिलेले नर व मादी बिबटे आणि त्यांचे २ बछडे यांना पकडण्यासाठी वन विभागाने १७ जानेवारीला दुपारी आणखी २ पिंजरे या परिसरात लावले आहेत.

# गळफास घेऊन १३ वर्षाच्या शाळकरी मुलीची आत्महत्या

नगर – राहत्या घरात सिलिंग फॅनला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन १३ वर्षाच्या शाळकरी मुलीने आत्महत्या केल्याची घटना नवनागापूर येथील साईनगर, मनोरमा कॉलनीत १६ जानेवारीला दुपारी घडली. दिव्या सत्येंद्र शहा (वय १३, रा.साईनगर, मनोरमा कॉलनी, नवनागापूर) असे मयत मुलीचे नाव आहे.

दिव्या हिने घरात सिलिंग फॅनला साडीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे निदर्शनास आल्यावर तिच्या वडिलांनी तिला बेशुद्धावस्थेत दुपारी ४.२० च्या सुमारास उपचारासाठी जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले. तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. ढगे यांनी तिची तपासणी केली असता ती उपचारापूर्वीच मयत झाली असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी तशी माहिती पोलीस अंमलदार गोसावी यांना दिली. अंमलदार गोसावी यांनी दिलेल्या खबरीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलीस अंमलदार अडबल हे अधिक तपास करत आहेत.

# नसबंदीऐवजी बिबट्यांसाठी बंदिस्त निवारा केंद्र उभारावेत

नगर – राज्यातील बिबट्यांची नसबंदी करण्यासंदर्भात केंद्राकडे प्रस्ताव पाठविणार असल्याचे समजले. परंतु बिबट्यांची नसबंदी करून मानव, पशुपक्षी हत्या थांबणार नाही. त्यासाठी बंदिस्त बिबट्या निवारा केंद्राची उभारणी करण्यात यावी, अशी मागणी नितीन थोरात यांनी केली आहे.

याबाबत वनमंत्री गणेश नाईक यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बिबट्यांची नसबंदी करून ते बिबटे पुन्हा निसर्गात सोडणार असाल तर त्या माध्यमातून एखाद्या वेळेस प्रजनन दर कमी होण्यास मदत होऊ शकेल. परंतु बिबट्याची नसबंदी आपण करू शकणार नाही हे खरे आहे. त्यामुळे मूळ समस्या सुटत नाही. बिबट्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातील शेतकरी, ऊसतोड मजूर व पाळीव प्राणी यांचा प्राणहानी होत आहे. यावर शाश्वत उपाय केवळ बिबट्यांना बंदिस्त करणे हाच आहे. कारण बिबट्यांना रोज काही ना काही खायला लागते व त्यांची एकूण संख्या पहाता निसर्गात त्यांचे नैसर्गिक भक्ष आता उपलब्ध नाही. त्यामुळे बिबट्या मनुष्य व त्याच्या पाळीव प्राण्यांवर सध्या अवलंबून आहे हे खरे आहे. त्यावर केवळ त्यांना मारून टाकणे किंवा बंदिस्त करणे हाच आहे, असे थोरात यांनी म्हटले आहे.

आमदार सत्यजित तांबे यांनी बिबट्याच्या प्रश्नावर गणेश नाईक यांना निवेदन दिल्याचे समजले.

महानगरपालिकेचे भटके कुत्रे पकडून त्यांचे निर्बिजीकरण करण्यात यावे असा महाराष्ट्र राज्यात आदेश आहे. परंतु आजपर्यंत हा उपक्रम प्रत्यक्षात कृतीत आलेला नाही. मग अत्यंत हिंस्त्र अशा बिबट्या प्राण्यास कोण जागेवर जाऊन पकडणार व त्याची नसबंदी करणार. याबाबत शासनाकडे काय पायाभूत सुविधा आहेत. प्रत्यक्षात हे शक्य नाही. वाढते बिबट्याचे प्रजनन दर कोणीही रोखू शकत नाही. सदरचे निवेदन हे केवळ समाजाची दिशाभूल करणारे आहे.

केंद्र सरकार या गोष्टीला मान्यता देणार नाही ही खरी वस्तुस्थिती आहे. बिबट्याच्या हल्ल्यात नागरिक व पशुपक्षी मेले तरी चालतील त्यांना योग्य नुकसान भरपाई दिली जाईल, अशी शासनाची भूमिका आहे. महाराष्ट्र शासन वनविभाग बिबट्या/वाघ यांच्या हल्ल्यात मृत्युमुळी पडणाऱ्या लोकांबद्दल संवेदनशील व गंभीर नाही. बिबट्यामुळे राज्यात रोज एक–दोन व्यक्ती मारले जातात, परंतु शासन त्याची गंभीर दखल घेण्यास तयार नाही, असेही थोरात यांनी म्हटले आहे.

## श्रीमती सूरजबाई ताथेड यांचे निधन

नगर – येथील सूरजबाई रूपचंद ताथेड (वय ७५) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली स्वाती सोलंकी, समता दुगड, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



तेलाचे व्यापारी संजय रूपचंद ताथेड यांच्या मातोश्री होत. त्या अतिशय मनमिळाऊ आणि धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांच्यावर अमरधाम येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## नारायण शेकटकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – येथील नारायण राम कृष्ण शेकटकर (वय ७६, रा.५३६, भराडगल्ली, नेहरुमार्केटच्या मागे) यांचे १६ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## सुधाकर शेकटकर यांचे आकस्मिक निधन


नगर – येथील सुधाकर रामचंद्र शेकटकर (वय ७३, रा.ऐक्यनगर, भारत गॅस गोडाऊन जवळ, पाईपलाईन रोड) यांचे १६ जानेवारी रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांचे विळद येथील विखे पाटील हॉस्पिटल येथे देहदान करण्यात आले.



त्यांच्यामागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. चेतन व अमित शेकटकर यांचे ते वडील होत.

## बाळकृष्ण सप्रे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – येथील बाळकृष्ण बाबूराव सप्रे (वय ७६, रा.रेल्वे स्टेशन रोड, आगरकर मळा) यांचे १६ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ते प्रतीक प्रिंटर्सचे संचालक होते. त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. संदीप, सचिन, शैलेश सप्रे यांचे ते वडील होत.



## सौ. शांताबाई माने यांचे हृदयविकाराने निधन

नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवाशी सौ. शांताबाई सीताराम माने (वय ७०) यांचे १६ जानेवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, १ मुलगा, सुन, ४ मुली, जावई, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे.





विविध मागण्यांसाठी महापालिकेसमोर उपोषणास बसलेले बहुजन आंबेडकरवादी चळवळीतील कार्यकर्ते. (छाया – लहू दळवी)



## ह.भ.प.बद्रिनाथ महाराज तनपुरे यांचा सपत्नीक मानपत्र देऊन सत्कार

राष्ट्रमाता जिजाऊ जिल्हा महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित शाखेचा वर्धापन दिनी व राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब जन्मोत्सव निमित्त ह.भ.प.बद्रिनाथ महाराज तनपुरे यांचा सपत्नीक मानपत्र देऊन सत्कार करताना पद्मश्री पोपटराव पवार. समवेत सकल मराठा शिवप्रेमी मंडळाचे शिवश्री रामकृष्ण कर्डिले, आप्पासाहेब बोडखे, दत्तात्रय जगताप, दत्तात्रय कर्डिले, अमोल शिंदे, चेअरमन शिवमती सुनिता कर्डिले, व्हा.चेअरमन प्रा.डॉ. अंजली खिलारी, सविता कराळे, कमलताई कराळे, सिंधुताई हारदे, कांताताई बोडखे, स्वातीताई कासार, मायाताई जगताप, कांताताई बोठे, अक्षदा रहाणे, सविता बर्डे, सुलोचना कराळे, शोभाताई कांबळे, सुरेखा तापकिर, अबिलवादे मॅडम आदी (छाया: यतीन कांबळे)

# प्रश्नांसंदर्भात शिक्षक भारती संघटनेचे २२ जानेवारीला 'असंतोष आंदोलन'

### आयुक्त कार्यालयातील प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले निवेदन



शिक्षण आयुक्त कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी रजनी रानडे यांना आंदोलनाचे निवेदन देताना शिक्षक भारतीचे पदाधिकारी.

नगर – विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नासंदर्भात, व उपसंचालक कार्यालयातील भ्रष्ट व मग्रूर लिपिक यांच्या विरोधात शिक्षण आयुक्त यांच्या दलनासमोर असंतोष आंदोलन पुणे विभागीय शिक्षक भारती संघटना करणार आहे. अहिल्यानगर,सोलापूर,पुणे जिल्ह्याचे सर्व शिक्षक भारती पदाधिकारी, सदस्य, प्रलंबित प्रश्न असलेले शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित राहणार आहे. यावेळी अन्यायग्रस्त कर्मचारी यांनीही उपस्थित राहण्याचे आवाहन कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक भारती संघटना अहिल्यानगरच्या महिला जिल्हाध्यक्ष रूपालीताई कुरुमकर यांनी केले.

शिक्षण आयुक्त कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी रजनी रानडे यांना आंदोलनाचे निवेदन देण्यात आले. या आंदोलनास राज्य सचिव सुनील गाडगे, उच्च माध्यमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, सरचिटणीस महेश पाडेकर, माध्यमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, सोलापूर जिल्हाध्यक्ष सुजित काठमोरे, पुणे जिल्हाध्यक्ष अशोक बोबडे, सचिव विजय कराळे, महिला जिल्हाध्यक्षा रूपाली कुरुमकर, जिल्हा उपाध्यक्ष सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, प्रसिद्धीप्रमुख अमोल चंदनशिवे, तालुका अध्यक्ष संजय सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, संजय भालेराव, संजय तमनर, नानासाहेब खराडे, रूपालीताई बोरुडे, मफीज इनामदार, कल्पना चौधरी, अकील फकीर, बाबाजी लाळगे, संपत वाळके उपस्थित राहणार आहेत.

# नगरपरिषद व नगरपंचायत कंत्राटी सफाई कामगारांना किमान वेतन व इतर लाभ द्या अन्यथा २८ जानेवारीला 'निषेध आंदोलन'

**अखिल महाराष्ट्र सफाईगार व चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेचे जिल्हाधिकारी यांना निवेदन**

नगर – जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायतमध्ये कार्यरत कंत्राटी सफाई कामगारांना किमान वेतन कायदा १९४८ नुसार वेतन मिळावे, भविष्य निर्वाह निधी व कामगारांसाठी असलेल्या इतर सुविधा मिळण्याच्या मागणीसाठी अखिल महाराष्ट्र सफाईगार व चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन संघटनेचे जिल्हाध्यक्ष तानसेन बिवाल यांनी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ व सहाय्यक कामगार आयुक्त यांना देण्यात आले. हा प्रश्न न सुटल्यास २८ जानेवारी रोजी संघटनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निषेध आंदोलन करुन उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

जिल्ह्यातील राहता, देवळाली, राहुरी, शेवगाव, नेवासा, श्रीरामपूर, संगमनेर, कोपरगाव, पाथर्डी नगरपरिषद व अकोला व इतर नगरपंचायतमध्ये कार्यरत कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायदा १९४८ नुसार वेतन दिले जात नाही. तसेच भविष्य निर्वाह निधीसह इतर सुविधांचा लाभ दिला जात नाही. अनेक वेळा तक्रार करूनही सहाय्यक कामगार आयुक्त याची दखल घेत नाही. या संदर्भात सुरु असलेल्या पाठपुराव्याला ११ महिने उलटूनही सफाई कामगारांना न्याय मिळालेला नाही. ही अत्यंत गंभीर स्वरुपाची बाब असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.



नगरपरिषद व नगरपंचायतीच्या कंत्राटी सफाई कामगारांना किमान वेतन व इतर लाभ द्या या मागणीसाठी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांना निवेदन देताना संघटनेचे जिल्हाध्यक्ष तानसेन बिवाल.

जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शाखांना या प्रश्नाबाबत गांभीर्य नसल्याने ते कोणत्याही तारखेला उपस्थित राहिलेले नाही. महाराष्ट्र शासन व नगरपालिका प्रशासन संचालनालय यांनी देखील वारंवार पत्राद्वारे आदेशित केले आहे. राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग (नवी दिल्ली) अध्यक्ष गोरख लोखंडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेतली होती. त्याच अनुषंगाने किमान वेतन देण्याबाबतचे अनेक वेळा आदेशित केलेले आहे. परंतु जिल्ह्यातील नगरपालिका, नगरपंचायतीमध्ये कोणत्याही प्रकारचे किमान वेतन १९४८ नुसार अंमलबजावणी होत नाही. महाराष्ट्र शासन परिपत्रक व वरिष्ठांच्या आदेशांची पायमल्ली होत असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

सफाई कर्मचारी हा घटक स्वतःचे जीव धोक्यात घालून, इतरांच्या आरोग्यासाठी स्वच्छतेचे काम एकनिष्ठपणे करीत आहे. त्यांना पगार दोनशे रुपये, अडीचशे रुपयाप्रमाणे ठेकेदार हजेरी देत आहे. त्यांना अपशब्द वापरून हिणवले जाऊन कामावरून काढण्याची धमकी देखील दिली जात आहे. लाखो रुपयांचे टेंडर पास करून संबंधित अधिकारी कामगारांच्या टाळूवरचे लोणी खात असल्याचे संघटनेने म्हंटले आहे. हा प्रश्न तात्काळ न सुटल्यास २८ जानेवारी रोजी आंदोलन करण्याचे जाहीर करण्यात आले आहे. या आंदोलनात जिल्ह्यातील सफाई कर्मचाऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### साखरेची पातळी ठेवा नियंत्रीत

काळ्या उडदाचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो. उडदाच्या डाळीमध्ये ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो, याचा अर्थ ते रक्तप्रवाहात हळूहळू ग्लुकोज सोडते. कमी ग्लायसेमिक असलेले पदार्थ रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करतात.

## पाककला

### भोगीची भाजी

**साहित्य :** १ चिरलेला बटाटा, १ मध्यम आकाराचं चिरलेलं वांगे, १ चिरलेलं गाजर, अर्धी वाटी ताजे मटार, अर्धी वाटी हिरवे हरभरे, १ मोठा चमचा भिजवलेले शेंगदाणे, १ मोठी शेवगाची शेंग (लांब काप केलेली). २ चमचे तिळकूट, २ चमचे चिंचेला कोळ, १ मोठा गूळ,मोठा चमचा ओलं खोबरं, चवीपुरते मीठ, फोडणीसाठी तेल

**कृती :** पातेल्यात तेल गरम करून मोहोरी, जिरे, हिंग, हळद, लाल तिखट, आणि कढीपत्ता घालून फोडणी करावी. यात शेंगदाणे, ताजे मटार, हिरवे हरभरे, बटाटा, शेवग्याच्या शेंगा आणि मीठ घालून वाफा काढाव्या. नंतर वांगं आणि गाजर घालून जरा पाणी घालून पातेल्यावर झाकण ठेवून शिजू द्यावे. भाज्या शिजत आल्यावर चिंच कोळ आणि काळा मसाला घालावा. शिजल्यावर गूळ, तिळाचा कूट, खोबरं घालावे. भाकरीबरोबर गरमागरम भाजी सर्व्ह करावी.

## वास्तू

### ऑफीसचा वायव्य भाग

* वायव्य भागात सेल्स प्रमोशन साहित्य, विविध कर्जयोजनांचे फॉर्म्स अथवा ज्या विविध सेवा बँक ग्राहकांना विकण्यास उत्सुक असते त्या याच दिशेत असाव्यात.

* मोठमोठ्या वाडा टाईप वास्तूमध्ये ब्रम्हतत्त्व पूर्णपणे मोकळे सोडलेले असते. माध्यान्हीच्या सूर्याचे किरण सरळ वास्तूमध्ये येतात.

## सल्ला

ब्रम्हस्थानात देवघर मुळीच नसावे, अगदी ब्रम्हतत्त्वाच्या ईशान्य भागातसुद्धा असता कामा नये. अन्यथा अदृश्य शक्ती किंवा पितरांशी संबंधित शक्तींचा धोका वढतो.

## सौंदर्य

वॉटरप्रूफ मस्करा लावावा. ब्रशच्या साहाय्याने पापण्यांना वरच्या दिशेने गोलाकार करत मस्करा लावावा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. १८ जानेवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष कृष्णपक्ष, पूर्वा १४।५२, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** अनेक विघ्नांना पार कराल. यश मिळेल.

**वृषभ :** कौटुंबिक विषयांमध्ये आपणास समर्थन मिळेल.

**मिथुन :** आर्थिक विषयांसाठी स्थिती अनुकूल आहे.

**कर्क :** व्यवसायात प्रगती कराल. मागील उधारी वसुल होईल.

**सिंह :** अत्यंत परिश्रम केल्यानंतर थोडे यश मिळेल. आरोग्य मध्यम राहील.

**कन्या :** वाहन चोरीस जाईल. हितशत्रू डोके वर काढतील.

**तूळ :** मनावर नियंत्रण ठेवाल. पैशाची गरज भागेल.

**वृश्चिक :** कुटुंबियांबरोबर आवश्यक वार्तालाप होईल.

**धनु :** कामे मार्गी लागतील.

**मकर :** एखाद्या विशिष्ट योजनेला हातावेगळे कराल.

**कुंभ :** आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसायात स्थिती सुखद राहील.

**मीन :** एखादी कौटुंबिक समस्या निर्माण होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

### रांगेत

एका माणसाने ट्रंककॉल बुक केला. बराचवेळा झाला, तो काही लागेना. म्हणून तो माणूस रागारागाने ऑपरेटरला म्हणाला, 'रद्द करा माझा कॉल.'

'असा लगेच रद्द होणार नाही. त्यासाठी भली मोठी रांग आहे. त्यात तुम्ही उभे रहा' ऑपरेटरने फोनवरून उत्तर दिले.

# जागतिक आश्चर्ये


### टेरेकोट्टा आर्मी

१९७४ मध्ये खेड्यातील शेतकऱ्यांनी टेरेकोट्टा येथील आर्मीचा शोध लावला. जो चिनमध्ये झायन येथील चीन देशात या आर्मीचा शोध लागला. टेरेकोट्टा पद्धतीच्या पुतळ्यांसमान बनविले गेले आहेत. त्यावेळच्या सम्राटाचा मृत्यू झाल्यानंतर टेरेकोट्टा पद्धतीची आर्मी वापरली जायची.

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०९४

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) गणितातील एक प्रकार ४) आयोग; कमिटी; मंडळ ६) बुद्धिबळ किंवा सोंगट्या वगैरे ज्यावर खेळतात ते विशिष्ट आकाराचे वस्त्र ८) सत्त्वयुक्त; सकस ११) राखण; रक्षण; रखवाली १३) लाकूड कापण्याचे हत्यार १५) अनेक कपड्यांचे तुकडे एकमेकांना जोडून बनविलेले एक जाड वस्त्र १७) गव्हाचे कणीदार पीठ १८) रक्षा; जुन्या काळातील एक हिंदी चित्रपट अभिनेत्री १९) सराव; अभ्यास २०) बोलाचाल; भांडण २२) तिसरी तिथी; तृतीया २३) एक प्रकारची घोडागाडी

**उभे शब्द :-** १) कमी; करणे; उणे २) वडील; पिता; जनक; तात ३) एक क्षुद्र जीव; किडा ४) टोळीचा प्रमुख ५) तेल निघणारे एक धान्य; मस; चामखीळ ७) आघात; वार; जखम ९) समस्त; सारे १०) बारीक झणझण; गर्दी करून; पुष्कळ ११) विदर्भातील एक शहर; इंद्राची नगरी १२) नूतन; नवीन १४) कोठीवर नृत्यकाम करणारी स्त्री १६) किरकिर; डोकेदुखी १९) मिळून; बरोबर; सहवर्तमान; धरून २१) माझा; माझी; माझे

**शब्दगंध क्र. ७०९३ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. ११७२ चे उत्तर**



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** चांगली भूमिका, चांगले ध्येय आणि चांगले विचार असणारे लोक नेहमी आठवणीत राहतात.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## काळे की पिवळे, कोणते मनुके खाणे सर्वात फायदेशीर आहे?

मनुके, एक सुकामेवा जो त्याच्या गोडवा आणि पौष्टिकतेसाठी ओळखला जातो. हे नाश्त्यात, स्नॅक्समध्ये किंवा मिष्टान्नांमध्ये वापरले जाते, पण तुम्हाला काळ्या आणि पिवळ्या मनुक्यांमधील फरक माहित आहे का? कोणते मनुके खाणे जास्त फायदेशीर आहे? या प्रश्नाचे उत्तर सविस्तरपणे समजून घेऊया.

काळ्या मनुक्यांची चव पिवळ्या मनुकांपेक्षा गोड आणि गडद असते. त्याचा रंग गडद तपकिरी किंवा काळा असतो. काळ्या मनुक्यात पिवळ्या मनुक्यांपेक्षा जास्त अँटीऑक्सिडंट्स, फायबर आणि पोटॅशियम असते. काळे मनुके हाडे मजबूत करण्यास, रक्तदाब नियंत्रित करण्यास, पचन सुधारण्यास आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतात. मात्र काळ्या मनुक्यात कॅलरीज जास्त असतात, म्हणून ते कमी प्रमाणात खावेत.

जर काळ्या मनुक्यांची पिवळ्या मनुक्यांशी तुलना केली तर पिवळ्या मनुक्यांना थोडी गोड आणि हलकी चव असते. त्याचा रंग हलका तपकिरी किंवा सोनेरी असतो. पिवळ्या मनुक्यात व्हिटॅमिन बी, लोह आणि मॅग्नेशियम सारखे पोषक घटक आढळतात. पिवळे मनुके थकवा दूर करण्यास, अशक्तपणा रोखण्यास, मज्जासंस्था मजबूत करण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करतात. पिवळ्या मनुक्यात काळ्या मनुकांपेक्षा कमी पोषक घटक असतात.

दोन्हीमध्ये वेगवेगळे पोषक तत्वे आणि फायदे असल्याने कोणते मनुके सर्वात फायदेशीर आहेत हे सांगणे कठीण आहे. जर तुम्हाला तुमच्या शरीरात अँटिऑक्सिडंट्स आणि फायबरचे प्रमाण वाढवायचे असेल तर काळे मनुके तुमच्यासाठी एक चांगला पर्याय आहे. जर तुम्हाला व्हिटॅमिन बी, आयर्न आणि मॅग्नेशियमची कमतरता असेल तर पिवळे मनुके तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतात.

मात्र दोन्ही प्रकारच्या मनुक्यांमध्ये कॅलरीज जास्त असतात, म्हणून ते माफक प्रमाणात खावेत. मनुके खरेदी करताना त्यांची गुणवत्ता तपासा. ते स्वच्छ आणि ताजे असल्याची खात्री करा. विविध पोषक तत्वे मिळविण्यासाठी तुम्ही तुमच्या आहारात दोन्ही प्रकारचे मनुके समाविष्ट करू शकता. काळे आणि पिवळे मनुके दोन्ही चविष्ट आणि पौष्टिक असतात. तुमच्या गरजा आणि आवडीनुसार तुम्ही यापैकी कोणताही मनुका निवडू शकता.


## स्वच्छंदीपणा

एक लोणारी आपले गाढव रस्त्याने हाकीत चालला असता ते मध्येच रस्ता सोडून भलत्याच वाटेने जाऊ लागले व लवकरच एका डोंगराच्या कड्यावर आले, तेथून ते लवकरच खाली पडणार, इतक्यात त्याचा मालक चटकन त्याच्याजवळ गेला व त्याचे शेपूट धरून त्याला मागे खेचण्याचा प्रयत्न करू लागला. पण गाढव हट्टाने पुढेच ओढू लागले. मग निरुपाय होऊन लोणाऱ्याने त्याचे शेपूट सोडून दिले व तो म्हणाला,

'अरे, इतके दिवस तू माझ्या आज्ञेत होतास, तोपर्यंत तुझं रक्षण मी केलं पण आता तू स्वतंत्र होऊन वाटेल तसं वागू लागलास, यामुळे तुझा जीव जर धोक्यात पडला तर त्याबद्दलची जबाबदारी माझ्यावर नाही.'

तात्पर्य : जोपर्यंत आपला माणूस आपल्या ताब्यात आहे तोपर्यंत त्याच्या सुखासाठी माणूस झटतो पण जेव्हा तो अनावर होऊन स्वच्छंदीपणाने वागू लागतो तेव्हा तो त्याचा तिरस्कार करू लागतो.

# रहमते दर्शन (भाग - १)



पिताजी दिल्ली आये, नामदान लिया और हमारे परिवार की काया पलट गई। अब हमारे घर में स्वर्ग जैसा माहौल पैदा हो गया है। हम सभी भाई-बहन अच्छे चरित्र के उत्तम विचार वाले बन गये हैं और नेक जीवन व्यतीत करते हुए ऊँची शिक्षा ग्रहण कर रहे हैं।

### निजी अनुभव

जुलाई सन् १९८५ की बात है, मेरी पत्नी जनरल अस्पताल,शाहदरा में दाखिल थी, ग्लूकोज़ चढ़ाया जा रहा था। रात्रि के समय, दो बजे अचानक मेरी पत्नी मेरी भाभी से हँस कर कहने लगी, अरी बीबी, गुरु जी आ गये। मेरी भाभी ने नाम की दौलत मेरे साथ ही परम संत कृपालसिंह जी से १९७३ में ली थी। वह सिरहाने बैठी थी। मैं ग्लूकोज़ के चढने की वजह से पैरों की ओर बैठा था। मेरी भाभी ने कौन-से गुरु जी आ गये? तब वह कहने लगी कि हुज़ूर बाबा सावनसिंह जी आ गये हैं। भाभी ने पूछा

### वे एक समाज सुधारक भी थे

कि क्या कह रहे हैं। मेरी पत्नी कहने लगी कि हँस रहे हैं। फिर ज़ोर से बोली, अरी बीबी, आपके दूसरे गुरु जी परम संत कृपालसिंह जी आ गये। भाभी ने पूछा, वह क्या कह रहे हैं? मेरी पत्नी ने बताया कि वो हाथ उठाकर आशीर्वाद दे रहे हैं। फिर ज़ोर से बोली, अरी बीबी, आपके दयाल पुरुष संत ने वो क्या कह रहे हैं? उसने दर्शनसिंह जी भी आ गये। भाभी ने पूछा, बताया कि वो हाथ जोड़ रहे हैं। ये सुनकर मैं बोल उठा कि अब तुमको कोई भी रोकने वाला नहीं है। तीनों ही गुरु तेरी सँभाल करने आ गये। तुझसा धन्य और कौन होगा? और इस प्रकार कुछ देर में उसकी समाधि लग गई। हम अपने स्वार्थ को रोते हैं, वरना दयाल पुरुष दया करके उसे अंतिम समय में अपनी गोद में ले लिया था। ये है गुरु की सँभाल, जो मेरे जीवन की सच्ची घटना है। गुरु अपने शिष्य की हर समय सँभाल करता है।

### वे सब कुछ जानते थे

मेरी माता जी संत कृपालसिंह जी महाराज की परम भक्त थीं। उन्हें १९५२ में महाराज जी से दीक्षा मिली। उस समय मैं ६ वर्ष का था। १९७२ में मेरा विवाह हुआ। उस समय तक मैं महाराज जी के चरणों में जाता रहा था। १९७४ में महाराज जी के चोला छोड़ने के पश्चात, हम समय के महापुरुष संत दर्शनसिंह जी के दर्शनार्थ 'मोना काटेज' हौज़ खास, दिल्ली में जाया करते थे ।

बात १९७६ की है। मेरी अब तक कोई संतान नहीं थी । मैं सब डॉक्टरों के पास इलाज भी करा चुका था परन्तु कोई परिणाम नहीं निकला। अंत में मैंने महाराज जी से इस विषय में बातचीत की। महाराज जी ने मुझे एवं मेरी पत्नी को आशीर्वाद दिया और मुझे डॉ. अरोड़ा के पास दवा लेने हेतु भेज दिया। डॉक्टर अरोड़ा ने मुझसे सब बातें विस्तार से पूछीं, परन्तु दवाई कोई नहीं दी। मैं इसे महाराज जी की मौज समझकर घर आ गया और पहले की

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

सतोगुण पैदा करने के लिये शिव बाबा या इष्ट को याद करते रहो। विश्व को प्रेम की तरंगे देते रहो। सतोगुण की विशेषतायें याद रखने के लिये मन में एक योगी का चित्र देखते रहो। अपनी समझ से किसी भी चीज या सूचना को याद रखने के लिये कोई भी चित्र बना सकते हैं।

स्मरण शक्ति और दिलचस्पी

अनेको जन्मों के पाप कर्मों, विकारों और कुपोषण के कारण मनुष्य का मस्तिष्क कमजोर हो जाता है। जिस का मस्तिष्क कमजोर है उस की स्मरण शक्ति कभी उड़ान नहीं भरेगी। वह कभी उचित और अधिक नहीं सोच सकेगा। ऐसा व्यक्ति कभी तपाक से किसी प्रश्न का उतर नहीं दे सकेगा। स्मरण शक्ति कमजोर होने का दूसरा कारण है हमारी दिलचस्पी हमें वही चीजें याद रहती हैं जिस में हम दिलचस्पी लेते हैं। एक व्यक्ति को शेयरस के भाव याद रहते हैं। क्योंकि यह उसका बिजनेस है और इस में उसकी दिलचस्पी होती है। एक वकील को गवाहों के नाम और ब्यान याद रहते हैं, क्योंकि वह इन में दिलचस्पी लेता है ताकि वह केस की पैरवी कर सके। हमें किसी व्यक्ति का नाम इसलिए याद

### दिमाग की शक्ती

नहीं होता क्योंकि जब उस से हमारा परिचय कराया जाता है तो हमारा ध्यान कहीं और होता है। यदि हम किसी ऐसे विषय को पढ़ते हैं जिस में हमारी दिलचस्पी होती है तो वह हमें याद हो जाता है। बिना दिलचस्पी वाला विषय हमें याद नहीं रहता और न ही हमें समझ आता है। भुलक्कड़पन का इलाज है जिस व्यक्ति या विषय पर बताया जा रहा है उस में दिलचस्पी लें। व्यक्ति अपने बारे, अपने व्यापार के बारे और अपनी समस्याओ के बारे भी सोचता रहता है। ऐसे व्यक्ति दूसरों की बातें ध्यान से नहीं सुनते और न ही उन में दिलचस्पी लेते हैं। पढ़ते समय जब हमारा मन और और सोचता रहता है तो वह हमें याद नहीं रहता। घर की चाबियां याद नहीं आती कहां रख दी। लोग समझते हैं स्मरण शक्ति कमजोर हो गई है। असल में जब चाबियां रख रहे थे तो ध्यान कहीं और चला गया था। किसी ने दरवाजे पर दस्तक दे दी थी। बच्चे ने पानी मांग लिया था। किसी खाने पीने की चीज में ध्यान चला गया था। ऑफिस का कोई काम याद आ गया था और ध्यान चाबी से हट गया था। इस लिये याद नहीं रहता कि चाबियां कहां रख दी। चाबियों को हमेशा घर के अंदर दीवारो पर लगी किसी न किसी खूंटी पर टांग दिया करो। वह आप तुरंत ढूंढ लेगें। जिस चीज को याद रखना चाहते हैं उसे पढ़ने और सुनने के थोडी देर बाद एक बार दोहरा लें। अगर पूरी तरह दोहराने का समय न हो तो सरसरी तौर से दोहराएं। सारे दिन जो कुछ आप ने पढ़ा है उसे शाम को एक बार दोहरा दो, फिर उसे ७ दिन में एक बार दोहरायें, फिर जो पूरे महीने पढ़ा हैं या कुछ और किया है, उसे हर महीने दोहराते रहें तो वह चीजें सदा याद रहेगीं। मन में कहते रहा करो मेरी यादाश्त बहुत अच्छी है, अच्छी है, इस से बंद केन्द्र खुल जाते हैं। स्मरण शक्ति स्मरण शक्ति को मजबूत बनाना चाहते हैं तो डायरी पेन साथ रखो। चाहे आप कितने व्यस्त हों, जब भी कोई बात कोई नया विचार आए उसे डायरी में नोट कर लो। यदि विचार रूपी पक्षी को, वह जब और जहां प्रकट हो, पिंजरे में बंद नहीं करेंगे तो वह उड़ जाएगा।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

व तिने सोसलेली सर्व वेदना ती एका क्षणामध्ये विसरून जाते. काही वेळ सूतिकेला व बाळाला झोपवून ठेवावे. सूतिकेचा थकवा कमी झाल्यावर वातशामक औषधांनी सिद्ध तेल सूतिकेच्या अंगाला चोळावे व नंतर दशमूल, निर्गुडी ही औषधे आंघोळीच्या पाण्यात टाकून गरम पाण्याने आंघोळ करावी. बाळाला देखील बला तेल किंवा दुर्वांकुर बेबी ऑईल अंगाला लावून हलक्या हाताने मसाज करावे व बाळाला आंघोळ घालावी. यानंतर सूतिकेला दशमूलारिष्ट काढा पिण्यास द्यावा, कारण दशमूलारिष्ट काढा हा वातशामक असल्याने सूतिकेचा वातप्रकोप कमी . यानंतर सूतिकेला घरच्या गव्हापासून बनविलेल्या रव्याची पातळ पेज पिण्यास द्यावी. गाईच २ चमचे साजूक तूप टाकावे. तपामुळे वातशमन होण्यास मदत होते. यानंतर बाळाला सूवर्णसिद्ध जल पाजावे. त्याने रोगप्रतिकारशक्ती वाढते. त्यानंतर बाळाला आईच्या स्तनातून निर्माण होणारा चिकटस्राव (कोलोस्ट्रम) पाजावा. हा देखील बाळाची रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यास उपयोगी ठरतो. आई व बाळामध्ये स्तनपानामुळे प्रेमाचे नाते निर्माण होते व दूध निर्माण होण्याची प्रक्रिया जलद

### प्रसूतिअवस्था

रितीने होते. सूतिकेला भाजलेले तांदूळ व भाजलेले मूग यांची पातळसर खिचडी करुन खाऊ घालावी. यामध्ये फोडणीसाठी साजूक तुपाचा भरपूर प्रमाणात वापर करावा. फोडणीला आलं, लसूण, जिरे, काळी मिरी, पिंपळी वापरावी. चवीसाठी सैंधव मीठ वापरावे. या खिचडीमुळे सूतिकेचे वातशमन लवकर होते. तांदूळ व मूग भाजून घेतल्यावर शरीरामध्ये आमनिर्मिती होत नाही. रव्याची पेज, बाजरीच्या पिठाची पेज करताना साखरेऐवजी गूळ वापरावा; यामुळे सूतिकेचे रक्ताचे प्रमाण व्यवस्थित राहते. तसेच गुळामुळे वातशमनाचे कार्य देखील चांगले घडते.

---

### सूतिकेचा आहार

आयुर्वेदामध्ये बाळंतणीला 'सूतिका' असे म्हणतात. सूतिकेचा आहार हा सात्त्विक, शुद्ध असावा. प्रसूतीमध्ये होणारा धातूक्षय म्हणजे शरीराची झालेली झीज भरून काढणारा असावा. सुतिकेच्या आहारातून स्वतःच्या शरीराची झीज भरून काढणे तसेच बाळाचे स्तनपानातून पोषण होणे गरजेचे असते. नवजात बालक हे पूर्णपणे मातेच्या स्तनपानावर अवलंबून असते. त्याची शारीरिक व मानसिक वाढही स्तनपानावर अवलंबून असते म्हणून सूतिकेचा आहार स्तन्य उत्पन्न करणारा, झालेली झीज भरून काढणारा तसेच प्रसूतीमध्ये झालेल्या वातप्रकोपाचे शमन करणारा असावा. हुलग्याचे सूप आठवड्यातून २ ते ३ वेळा घ्यावे: त्यामुळे वातशमन होते. डिंक, खारीक, गोडांबी, आळीव, खोबरे, मेथी यांपासून बनविलेल्या लाडूने सूतिकेचे केस गळणे, कंबरदुखी हे आजार कमी होतात. तसेच गर्भाशयातील वात कमी होऊन गर्भाशय पूर्ववत होण्यास मदत होते.

सूतिकेने दिवसभर कोमट पाणी घ्यावे. हे पाणी रोज रात्री एका हंड्यामध्ये १५-२० मिनिटे उकळू द्यावे व ते गाळून प्यावे; यामुळे वातशमन होते, सुतिकेने खाल्लेले अन्न पचण्यास मदत होते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



'अहिल्यानगर महाकरंडक २०२५' या एकांकिका स्पर्धेचे सावेडी उपनगरातील माऊली सभागृहात उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित असलेले अभिनेते प्रवीण तरडे, स्नेहल तरडे, आशिष वाघ, मयूर हरदास, नरेंद्र फिरोदिया, स्वप्नील मुनोत, हर्षल बोरा आदी.

# अहिल्यानगर महाकरंडकचे उद्घाटन

नगर – 'अहिल्यानगर महाकरंडक २०२५' या एकांकिका स्पर्धेचे सावेडी उपनगरातील माऊली सभागृहात उद्घाटन करण्यात आले. ही स्पर्धा १६ ते १९ जानेवारी या कालावधीत सकाळी १० ते रात्री १० यावेळेत होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन परीक्षक, अभिनेता आणि दिग्दर्शक प्रवीण तरडे, स्नेहल तरडे, निर्माता आणि दिग्दर्शक आशिष वाघ, दिग्दर्शक आणि एडिटर मयूर हरदास, अहिल्यानगर महाकरंडक स्पर्धेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, संयोजक स्वप्नील मुनोत, महावीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष हर्षल बोरा आदीची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अहिल्यानगर महाकरंडक येथे शिवकालीन पुरातन नाणी, शिवकालीन शस्त्र आणि वस्तू यांचे प्रदर्शन देखील आहे. यानिमित्ताने रंगकर्मींना आणि स्पर्धेला भेट देणाऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील दुर्मिळ वस्तू पाहायला मिळत आहेत. स्पर्धेत प्रथम येणाऱ्या संघास १ लाख ५१ हजार १११ रुपये रोख, अहिल्यानगर महाकरंडक आणि प्रमाणपत्र असे पारितोषिक मिळणार आहे. तसेच विक्रमी रकमेची सांघिक आणि वैयक्तिक बक्षिसे देखील असणार आहेत.

मागील ११ वर्षांपासून 'अहमदनगर महाकरंडक' नावाने प्रसिद्ध असणारी ही स्पर्धा जिल्ह्याचे नाव 'अहिल्यानगर' असे बदलल्याने आता 'अहिल्यानगर महाकरंडक' नावाने ओळखली जाणार आहे. यंदाचे स्पर्धेचे हे १२ वे वर्ष आहे. मागील एका तपात ही स्पर्धा राज्यातील सर्वात मोठी मानाची एकांकिका स्पर्धा म्हणून नाट्य वर्तुळात ओळख निर्माण केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाला ३५१ वर्षे पूर्ण झाल्या निमित्त या एकांकिका स्पर्धेचं यंदाचं 'उत्सव रंगभूमीचा, सोहळा शिवराज्याभिषेकाचा' हे ब्रीदवाक्य आहे.

# नगरमध्ये अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्यसंमेलनाच्या तयारीला वेग

## गाजलेल्या एकांकिका, व्यावसायिक नाटकांसह बालनाट्य, लोककला महोत्सव



नगरमध्ये अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्यसंमेलनाच्या तयारीला वेग आला आहे.

नगर – अखिल भारतीय नाट्य परिषदेने १०० वे अखिल भारतीय मराठी विभागीय नाट्य संमेलनाचा मान अहिल्यानगर उपनगर शाखेला दिला आहे. त्यानुसार २६ व २७ जानेवारी रोजी हे विभागीय नाट्य संमेलन अहिल्यानगरमध्ये माऊली सभागृह व पेमराज सारडा महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आले आहे. नाट्यसंमेलनाची जय्यत तयारी सुरु झाली असून नगरकर नाट्य रसिक तसेच रंगकर्मींना मोठी सांस्कृतिक मेजवानी या संमेलनातून मिळणार आहे. नगरकर रसिकांनी संमेलनातील विविध कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन संमेलनाचे निमंत्रक आ.संग्राम जगताप यांनी केले आहे.

संमेलनाध्यक्ष डॉ.जब्बार पटेल यांच्या उपस्थितीत दोन दिवस बालनाट्य महोत्सव, लोककला महोत्सव, एकपात्री, संगीत नाट्य नाट्य प्रवेश, प्रायोगिक, व्यावसायिक नाटकांचे प्रयोग, एकांकिका, चर्चासत्रे, परिसंवाद, प्रशिक्षण शिबिरे असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत, अशी माहिती स्वागताध्यक्ष डॉ.बापूसाहेब कांडेकर, विभागीय संमेलन प्रमुख क्षितीज झावरे यांनी दिली.

संमेलनानिमित्त माऊली सभागृहात नाटकांचे प्रयोग होणार आहेत. २२ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता तुझी औकात काय आहे? या नाटकाचा प्रयोग रंगणार आहे. २३ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता साती साती पन्नास, २५ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता मर्डरवाले कुलकर्णी व समारोपाच्या दिवशी २७ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता मोरुची मावशी हे नाटक सादर होणार आहे. २४ जानेवारी रोजी बालमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात सकाळी १० ते ११ यावेळेत अजय लाटे लिखित आणि शैलेश देशमुख दिग्दर्शित एकांकिका जिना इसिका का नाम है! सादर होईल. सकाळी ११ ते १२ यावेळेत गौरी जोशी लिखित आणि डॉ. विजयकुमार दिग्दर्शित एकांकिका – हीच खरी सुरुवात, दुपारी १२ ते १ यावेळेत भारत शिरसाठ आणि चेतन सैंदाणे लिखित व आत्मदर्शन बागडे दिग्दर्शित एकांकिका – डस्टर सादर करण्यात येईल. दुपारी १ ते २ यावेळेत उद्घाटन समारंभ होणार असून दुपारी २ ते ३.३० यावेळेत रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन निर्मित कृष्णलीला ही नृत्य नाटिका सादर होणार आहे, अशी माहिती उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद बेडेकर आणि प्रमुख कार्यवाह चैत्राली जावळे यांनी दिली.

प्रजासत्ताक दिनी २६ जानेवारी रोजी सकाळी १० ते ११ यावेळेत लोककला महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ११ ते १२ यावेळेत एकपात्री आणि नाट्यप्रवेश सादरीकरण, दुपारी १२ ते १.३० यावेळेत संगीत नाटकातील नाट्यप्रवेश, दुपारी २ ते ३ यावेळेत परिसंवाद, चर्चासत्र होईल. दुपारी ३ ते ४ यावेळेत धाराशिव येथील कलाकार विशाल शिंगाडे निर्मित कार्यक्रम होणार आहे. २७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० ते ११ यावेळेत पुरुषोत्तम करंडक विजेती एकांकिका – देखावा (न्यू आर्टस् कॉलेज) सादर करण्यात येणार आहे. सकाळी ११.१५ ते १२.१५ यावेळेत उपनिषद (संकल्पना फौंडेशन, कोपरगाव), दुपारी १२.३० ते १.३० दरम्यान ब्रँडेड बाय सडकछाप (अहिल्यानगर) या गाजलेल्या एकांकिकांचे सादरीकरण होईल. दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत नाट्यजागर विजेती एकांकिका नवस सादर होणार आहे. दुपारी ३.४५ ते ५.०० नाटक समजून घेताना या विषयावर परिसंवाद होणार आहे. यात संमेलनाध्यक्ष डॉ.जब्बार पटेल, दिग्दर्शक विजय केंकरे, अभिनेते तथा अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले सहभागी होणार आहेत. संध्याकाळी ६ ते ८ दरम्यान संमेनलाचा समारोप समारंभ होणार आहे.

संमेलनाचे यजमानपद मिळाल्याने रंगकर्मींमध्ये उत्साहाचे वातावरण तयार झाले आहे. सर्व कलाप्रेमी नगरकरांसाठी संमेलन संस्मरणीय ठरावे यासाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. या संमेलनामुळे नगरच्या सांस्कृतिक वैभवात मोठी भर पडेल, असा विश्वास स्वागताध्यक्ष डॉ. बापूसाहेब कांडेकर यांनी व्यक्त केला.


याप्रसंगी मध्यवर्तीचे कोषाध्यक्ष सतीश लोटके, अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष अमोल खोले, मार्गदर्शक पी. डी. कुलकर्णी, जालिंदर शिंदे आदी उपस्थित होते.

# सामान्य कुटुंबातील तरुणाच्या स्वप्नांना बळ देण्यासाठी इंदिराची निर्मिती

## डॉ.तरिता शंकर यांचे प्रतिपादन; अहिल्यानगरमध्ये युथ यात्रा आणि लीडरशिप अ‍ॅवॉर्ड सोहळा; डॉ.तरिता शंकर, मकरंद अनासपुरे, निर्मिती सावंत व शिक्षणतज्ज्ञांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

नगर – सर्व सामान्यांना पडणारी स्वप्ने आणि धडपडया तरुणांची स्वप्न ही आपलीच स्वप्न आहेत. ती पूर्ण करणे ही आपली देखील जबाबदारी आहे अशा उदात्त भावनेतून टीम इंदिरा सतत तीस वर्षे झटते आहे. आतापर्यंत या संस्थेने हजारो विद्यार्थी घडविले. यापुढील काळातही विद्यार्थ्यांना केंद्र स्थानी ठेऊन इंदिरा विद्यापीठाची वाटचाल सुरु राहील, असे प्रतिपादन इंदिरा शिक्षण समुहाच्या अध्यक्षा व चीफ मेंटॉर डॉ. तरिता शंकर यांनी अहिल्यानगर येथे केले.

पिंपरी-चिंचवड (पुणे) येथील इंदिरा शिक्षण समूहाचे इंदिरा विद्यापीठात रूपांतर होतं आहे. त्याअनुषंगाने अहिल्या नगर शहरातील विद्यार्थ्यांसाठी इंदिरा युथ यात्रा आणि लीडरशिप अवॉर्ड सोहळ्याचे आयोजन बुधवारी (ता. १५) करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. याप्रसंगी सिने अभिनेते मकरंद अनासपुरे, निर्मिती सावंत, इंदिराचे सीईओ डॉ. पंडित माळी उपस्थित होते. यावेळी अहिल्या नगर शहरातील विद्यार्थी, पालक, विविध शिक्षण संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक उपस्थित होते. श्रुष्टी मुनोत आणि समृद्धी ठुबे या माजी विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले



अहिल्यानगरवासियांशी संवाद साधताना मकरंद अनासपुरे, निर्मिती सावंत, डॉ. तरिता शंकर व डॉ. पंडित माळी.

मकरंद अनासपुरे आणि निर्मिती सावंत यांच्याशी विद्यार्थी आणि पालकांनी मनसोक्त संवाद साधला. त्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरे देताना दोघांनीही कोपरखळ्या घेत उपस्थितांना खळखळून हसविले, शूटिंग दरम्यानचे किस्से, गंमती-जमती सांगतानाच संघर्षाच्या काळातील खाच-खळगे आणि हळवे कोपरे हळुवारपणे मांडले. यशाने हुरळून न जाता, अपयशाने खचूनही न जाता त्यातून बोध घेत जीवन जगायला शिका असा संदेश त्यांनी दिला. इंदिराचे सीईओ पंडित माळी यांनी प्रास्ताविकातुन इंदिराच्या कार्याचा आढावा घेताना जगभरातील विवीध देशांशी करार करून तेथील अनेक कोर्सेस इथे आणणार असल्याचे सांगितले. प्राचार्या डॉ. अंजली काळकर, रेणू गर्ग यांनी सूत्रसंचालन केले.

### यांचा झाला सन्मान

अशोकराजे निंबाळकर, सूर्यकांत वरकड, चंद्रकांत शेळके, ज्ञानेश दुधाडे, सूर्यकांत नेटके, अनिल हिवाळे, सचिन दसपुते, मिलिंद देखने, मोहनीराज लहाडे, संदिप जाधव, भाऊसाहेब होळकर, जयंत कुलकर्णी, वाजीद शेख, योगेश गुंड, शिरीष कुलकर्णी, अमित आवारी आदी पत्रकारांना जर्नलिस्ट एकलन्स अवॉर्ड व शिक्षण क्षेत्रातील डॉ. माहेश्वरी गावीत, प्रा.भागवत म्हस्के, डॉ. लक्ष्मणराव मतकर, भारत झंवर, डॉ. जयवंतराव टेमकतर, प्रा. गिरीष कुकरेजा, प्रा. महेश झरेकर, गावंडे यांना लीडरशिप अवॉर्ड देऊन गौरविण्यात आले.

### शासनाकडून अपेक्षा करणे थांबवा

प्रश्न-उत्तरांच्या सत्रात एका प्राध्यापकाने राज्यात शिक्षणासाठी केवळ ६ टक्के शेअर असल्याबाबत मत विचारले असता डॉ. तरिता शंकर म्हणाल्या, सर्वच शिक्षण संस्थांनी सरकारकडून अपेक्षा करण थांबविलं पाहिजे. आपण स्वतः होऊन प्रयत्न केल्याशिवाय गत्यतंर नाही. इंजिनिअरिंगच्या मुलांना समाज मनाच्या जाणीवा, संघर्ष, अपमान, अपयश पचविण्याची हिंमत मिळण्यासाठी मराठी साहित्याची ओळख करून दिली पाहिजे, असा प्रश्न डॉ. सूर्यकांत वरकड यांनी विचारला. या प्रश्नाला उत्तर देताना अनासपुरे म्हणाले, इंदिरा कॉलेजमध्ये दर महिन्याला विविध साहित्यिकांना एकत्र आणून त्यांचा साहित्य कट्टा हा उपक्रम आपण राबवूया. लेखक साहित्यिक उपलब्ध करून देण्याची जबाबदारी अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी घेतली.

# हिंदू धार्मिकतेच्या विरोधात उभारलेले अतिक्रमण सहन करणार नाही

## आमदार संग्राम जगताप यांचा इशारा; जय श्री रामाचा नारा व गणपती बप्पा मोरयाच्या जयघोष करत सिद्धिविनायक मंदिरासमोरील अतिक्रमण हटविले



कर्जत तालुक्यातील सिद्धटेक येथील सिद्धिविनायक मंदिरासमोर अनधिकृतपणेपणे केलेले अतिक्रमण हटविण्यात आले याप्रसंगी उपस्थित असलेले आ. संग्राम जगताप.

नगर – कर्जत तालुक्यातील सिद्धटेक येथील सिद्धिविनायक मंदिरासमोर अनधिकृतपणेपणे अतिक्रमण उभारण्यात आले. हे मंदिर अष्टविनायकांपैकी एक गणपती मंदिर असून हिंदू बांधवांचे श्रद्धास्थान असून हिंदू धार्मिकतेच्या विरोधात उभारलेले अतिक्रमण सहन करणार नाही. म्हणत मंदिरासमोरील थडग्याचे अतिक्रमण शेकडो हिंदू बांधवांच्या साक्षीने काढण्यात आले. यावेळी ग्रामस्थ देखील उपस्थित होते. हिंदू धार्मिक स्थळाजवळ अशा प्रकारचे अनाधिकृत कृत्य करण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे हिंदू धर्माच्या भावना दुखावल्या जात असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

श्री सिद्धिविनायक मंदिर, सिद्धटेक येथे अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या थडग्यांविरोधात नगर जिल्ह्यातील सकल हिंदू समाज आक्रमक झाला आहे. या पार्श्वभूमीवर आ.संग्राम जगताप व सागर बेग यांच्या नेतृत्वाखाली शेकडो हिंदुत्ववादी कार्यकर्ते कर्जतमध्ये दाखल झाले. सदर प्रकरणात मंदिराच्या समोरील काही भागात अनधिकृतपणे थडगे उभारण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा भाग वक्फ बोर्डाचा असल्याचा दावा काही गटांकडून केला जातो. मात्र, हिंदू समाजाने या प्रकाराला तीव्र विरोध दर्शवत, अनधिकृत बांधकाम हटवण्यासाठी मोहीम राबविण्याचा निर्धार केला असून गुरुवारी सकाळपासून आ. संग्राम जगताप व सागर बेग आणि हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांचा ताफा सिद्धटेकमध्ये दाखल होत जय श्री रामच्या व गणपती बप्पा मोरयाच्या घोषणा देत अनधिकृत अतिक्रमण काढण्यात आले.

# गायत्री रोहोकले हिला 'तेरा मेरा सपना' या नाटकासाठी उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक प्राप्त



गायत्री रोहोकले हिला 'तेरा मेरा सपना' या नाटकासाठी उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक प्राप्त झाले.

नगर – महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित २१ वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा २०२४-२५ प्राथमिक फेरीत सप्तरंग थिएटर्स, अहिल्यानगर निर्मित बालनाट्य तेरा मेरा सपना या नाटकासाठी भाळवणी येथील गायत्री रोहोकले हिला उत्कृष्ट अभिनयासाठी उत्कृष्ट अभिनय रौप्य पदक मिळाले. तसेच नाटकास द्वितीय पारितोषिक व दिग्दर्शन द्वितीय पारितोषिक व नाटकाची अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे, तसेच यापूर्वी देखील महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित १८ वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा २०२१-२२ प्राथमिक फेरीत व अंतिम फेरीत सप्तरंग थिएटर्स, अहिल्यानगर निर्मित बालनाट्य मी तुझ्या जागी असते तर या नाटकासाठीही उत्कृष्ठ अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्र मिळालेले आहे तसेच १९ वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा २०२२-२३ प्राथमिक फेरीत व अंतिम फेरीमध्ये सप्तरंग थिएटर्स, अहिल्यानगर निर्मित बालनाट्य अजब लोठ्यांची महान गोष्ट या नाटकासाठी गायत्रीला उत्कृष्ठ अभिनयासाठी उत्कृष्ठ अभिनय रौप्य पदक मिळालेले आहे.

# अजातशत्रू....आमचा गुड्डू... योगेश मुनोत



काही माणसं आयुष्यात येतात आणि कायमच्या आठवणी मनात कोरून जातात.... १५ जानेवारी २०२५ ... आदल्याच दिवशी मकर संक्रांत साजरी केली...पतंग उडवले...पण यावेळी पतंगांचा आनंद लुटताना कुठं तरी एक कमी जाणवत होती...आपला गुड्डू दवाखान्यात आहे... यावर्षी नाही पण पुढच्या वर्षी तो नक्की पतंग उडवायला येईल...खास मेन्यू घेऊन... पण नियतीच्या मनात नव्हते... संक्रांतीनंतरची सकाळ उजडली ती नको असलेली बातमी घेऊन...आपला गुड्डू गेला... रात्रीच्या तिळगुळाचा गोडवा जीभेवरून नाहीसा झाला.. अतिशय कमी वयात आमचा गुड्डू आम्हाला सोडून गेला... एक डाव अर्ध्यावरच संपला..

योगेश सुरेश मुनोत अर्थात गुड्डू म्हणजे आमच्या जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांचा धाकटा भाऊ... अतिशय सुस्वभावी, अजातशत्रू असा गुड्डू... कायम इतरांच्या मदतीला तत्पर. गोरगरीबांविषयी त्याच्या मनात खूप कळवळा होता. एखाद्या गरजवंताला मदत करायची म्हटली की आधी खिशात हात घालून पैसे देणार. मंडळाच्या कार्यात तर घरातील कार्य असल्यासारखा सक्रिय असायचा. मी, पीटू भाऊ (प्रमोद गांधी) व गुड्डू रात्री नित्यनेमाने नवीपेठेत भेटायचो व दिल्लीगेटपर्यंत पायी फिरायला जायचो. गप्पा गोष्टी करताना तो नेहमी नवीन काय उपक्रम घ्यायचा यावर बोलायचा. धार्मिक कार्याची त्याला प्रचंड आवड होती. आनंदधामला तो नियमित दर्शनासाठी जायचा. साधू साध्वीजींच्या सान्निध्यात त्याला खूप आनंद मिळायचा. गणपतीवर त्याची नितांत श्रद्धा होती. गणेशोत्सवात, गणेश जयंतीला पूजा, आरतीची सगळी व्यवस्था तो मनोभावे करायचा. आचार्यश्रींच्या पुण्यतिथीला मंडळाच्या वतीने अन्नदान करण्यात येते. या काळात तर तो अक्षरशः चोवीस तास राबायचा. स्वयंपाक अतिशय उत्तम होईल आणि प्रत्येक जण पोटभर जेवेल याकडे त्याचे लक्ष असायचे. सामाजिक काम म्हटले की त्याच्यात उत्साह संचारत. कधीही कंटाळा करायचा नाही. अनेक सामाजिक संस्था, संघटनांच्या कार्यात तो उत्स्फूर्त योगदान द्यायचा.

गुड्डूचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याला मित्र मंडळींना चांगले खाऊ घालण्याची आवड होती. आम्ही एकत्र जमलो की तोच नाष्ट्याची व्यवस्था करायचा. प्रेमाने खाऊ घालायचा. स्वभावाने अतिशय मनमिळाऊ आणि हसतमुख असायचा. त्यामुळे त्याच्या सहवासात आम्हालाही आनंद मिळायचा. सगळ्या उपक्रमात तो असल्याने काम करायला आम्हालाही बळ मिळायचे. असा हा आमचा लाडका गुड्डू अचानक एक्झिट घेईल असे कधीच वाटले नव्हते. पण नियतीच्या पुढे कोणाचंच काही चालत नाही हेच खरे.. गुड्डू आज नसला तरी त्याची आठवण पदोपदी येईल. एक दिलखुलास व्यक्तिमत्त्व आम्ही गमावलं आहे. मंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमावेळी त्याची उणीव भासत राहील. त्याची आठवण कायम येत राहील. गुड्डु हो सके तो लौटके आना...

भावपूर्ण श्रद्धांजली गुड्डू!!

**– मनोज श्रीमल गुंदेचा,**

जय आनंद महावीर युवक मंडळ, नवीपेठ

# जिजाऊ हास्य योगा फौंडेशनचा मकरसंक्रातीला हास्य हळदीकुंकू, न भुतो न भविष्यती ५०० महिलांनी प्रथमच गाण्यावर ताल धरला



बडी साजन मंगल कार्यालयात मकरसंक्राती निमित्त गीतावर ठेका धरताना महिला.

नगर – जिजाऊ हास्य योगा फौंडेशन ने मकरसंक्रातीला आगळा वेगळा हास्य हळदीकुंकू सांस्कृतिक मोहोत्सव साजरा केला. हास्य' हे सर्व रोगांवस्चे रामबाण औषध आहे. ते पण विनामुल्य मिळते, तसेच देऊ शकतो. योगा तसेच इतर शारीरिक व्यायामाबरोबस्व हास्य योगा हा महत्वाचा भाग आहे.

फौंडेशनच्या संस्थापिका मनिषा गुगळे निरंतन नवे काही उपक्रम करतात. बडी साजन मंगल कार्यालयात मकरसंक्राती निमित्त ग्रुपने 'ये शाम मस्तानी' हा संदिप भुसे यांच्या गायनाचा कार्यक्रम आयोजित केला.

कार्यक्रमाचे प्रास्तविक संजय गुगळे (स्नेहालय) यांनी केले. योगाचा दैनंदिन जिवनावर होणारा प्रभाव त्याचे फायदे महत्त्व त्यांनी सांगितले. त्यानंतर गायिका रोहीणी आरोही यांच्या 'सत्यम शिवम सुंदरम' या गिताने कार्यक्रमाची सुरवात झाली.

अभय कांकरीया यांच्या 'कई बार युही देखा है' या मधुर गिताने रंगत आणली. डॉ. सत्तार सय्यद यांच्या बार बार देखो गीतावर महिला वर्गाने ठेका धरला. विद्या तन्वर यांनी दिल तो है दिल हे बहारदार गीत सादर केले. संदिप भुसे यांच्या फुलोंके रंग से या गिताने मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमात अभय कांकरीया यांनी मैंने तेरे लिए, मेहबुब मेरे, एक दिन बिक जायेगा ही श्रवणीय गीते सादर केली. डॉ. सत्तार यांनी पुकारता चला है, आके तेरी बाहोंमें, ही गीते सादर केली. संदिप भुसे यांनी चित्रपट कलाकारांच्या आवाजावर मिमिक्री सादर केली. त्यांनी गायलेल्या देखा जो तुझे यार, गुलाबी साडी, झिंगाट या गाण्यांवर सर्व महिला वर्गाने मनमुराद डान्स सादर केला.

गीतांची संध्याकाळ खऱ्या अर्थाने रंगावी आणि कोणतीही महिला खुर्ची वर बसून न राहता सक्रीय सहभागी व्हावी, यासाठी, मनिषा गुगळे यांनी कार्यक्रमात सादर होणार असलेल्या काही गाण्यांवर महिलांना नृत्य करता यावे आनंद घेता यावा यासाठी कोरीओग्राफर बोलावुन सर्व महिलांना नृत्यांचे धडे दिले. वय वर्षे १५ ते ८५ अशा सर्व महिलांना, यात सहभाग घेतला. न भुतो न भविष्यती अंदाजे ५०० महिलांनी प्रथमच गाण्यावर ताल धरत धमाल केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुशिला सहदेव, हेमा गुगळे, ज्योती भंडारी, सुरभी भळगट, अंकित गांधी यांनी परिश्रम घेतले

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# श्री आनंद पार्श्व गुरुकुलच्या नूतन वास्तूचे १९ जानेवारी रोजी उद्घाटन

## संस्कार, सेवा व शिक्षा या त्रिसूत्रीवर शिक्षण मिळणार

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांनी शिकवलेल्या संस्कार, सेवा व शिक्षा या त्रिसूत्रीवर आधारित शिक्षण देणाऱ्या केडगाव येथील श्री आनंद पार्श्व गुरुकुलची नूतन वास्तू साकारण्यात आली आहे. केडगाव अकोळनेर रोडवर ५ एकर प्रशस्त जागेत निसर्गाच्या सान्निध्यात आनंद नवकार परिवार ट्रस्टमार्फत गुरूकुलची उभारणी करण्यात येत असून या वास्तूचे उद्घाटन १९ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे.



श्रमण संघीय युवाचार्य श्री महेन्द्रऋषिजी म.सा., महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म.सा., प्रबुध्द विचारक श्री आदर्शऋषिजी म.सा., श्री हितेन्द्रऋषिजी म.सा., संस्कार दिवाकर श्री आलोकऋषिजी म.सा., श्री धवलऋषिजी म.सा. तसेच अन्य साधुसाध्वीजींच्या पावन सानिध्यात प्रा.राम शिंदे व अशोका बिल्डकॉनचे संचालक अशोक कटारिया यांच्या हस्ते नूतन वास्तूचे उद्घाटन होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जैन कॉन्फरन्स दिल्लीचे विश्वस्त मंडळ अध्यक्ष रमणलाल लुंकड हे भूषविणार आहेत. स्वागताध्यक्ष सौरभ बोरा आहेत. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून खा.निलेश लंके, डॉ.सुजय विखे पाटील, आ. संग्राम जगताप, विजयकांत कोठारी, पोपटलाल ओस्तवाल, राजकुमार चोरडिया, सुजाता लोढा, आस्था कटारिया, राजेंद्र मुथा, संजय चोपडा, विपुल शेटिया आदी उपस्थित असणार आहेत.

संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ.अशोककुमार पगारिया यांनी सांगितले की, प्रत्येक कुटुंबातील मुले, मुली यांना शिक्षणाबरोबरच संस्कारही मिळाले पाहिजे. यांच्या मनात सेवाभाव असायला हवा, समस्त जगाचे कल्याण इच्छिणारी मनोभूमिका हवी, सर्वांना सोबत घेवून चलण्याची हातोटी हवी हे आचार्यश्रींचे स्वप्न होते. तेच स्वप्न साकारण्यासाठी सन २००९ मध्ये आनंद पार्श्व गुरुकुलची स्थापना करण्यात आली. याठिकाणी इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत सीबीएसई पॅटर्नचे शिक्षण दिले जाते. प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तिक लक्ष देऊन त्याला प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे याठिकाणी शिक्षण घेत असलेला विद्यार्थी आत्मविश्वासाची आणि चारित्र्यसंपन्नतेची शिदोरी मिळवतो. या शैक्षणिक सेवा कार्याचा विस्तार होत असल्याने संस्थेने नवीन सुसज्ज अशी गुरुकुल इमारत उभारली आहे. या उद्घाटन सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष अशोक पारख, सचिव राजकुमार लुणिया, कोषाध्यक्ष मोहन बरमेचा व सर्व विश्वस्तांनी केले आहे.




पॅरालिंपिकपटू दीपा मलिक यांचा स्नेहबंध तर्फे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी सन्मान केला.

---

### योग विद्या धाम संस्थेच्या वतीने २१ जानेवारीपासून

# १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत परिक्षा 'भय निर्मुलन वर्ग'

नगर – दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना ताण तणाव न घेता बोर्डाची परिक्षा व्यवस्थित देऊन चांगल्या मार्कांवर उत्तिर्ण व्हावे म्हणून येथील योग विद्या धामचे वतीने विद्यार्थ्यांसाठी मोफत वर्ग २१ जानेवारी पासून घेतले जाणार आहेत, अशी माहिती अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी दिली.

दिवसेंदिवस वाढत जाणा–या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करूनही त्यांच्या शरीरावर व मनावर ताण येतो. त्यामुळे डोकेदुखी, निद्रा नाश, परीक्षेच्या आधी ताप येणे या सारखे आजार होऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान होते. हे टाळण्यासाठी परिक्षा भय निर्मुलन वर्ग आयोजित केले असून यामध्ये यौगीक प्रक्रिया शिकवून त्या द्वारे परीक्षेची भीती कशी कमी होईल याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. हे वर्ग २१ ते २६ जानेवारी या कालावधीत रात्री ८.३० ते ९.३० या वेळेत झूमवर ऑनलाईन घेतले जाणार आहेत.

हे वर्ग संपूर्ण मोफत घेतले जाणार आहेत. याचा विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

माहितीसाठी योग शिक्षका सौ. दिपमाला लांडे भ्रमणध्वनी नं ७९७२३५३२२५ यांचेशी संपर्क साधावा. या वर्गासाठी झुम मिटींग आयडी–८५१ १०३८ २७२२ व पासवर्ड १२३ आहे.

प्रत्येकाला आपल्या घरातून हा वर्ग करता येणार आहे.

---

# एकदंत कॉलनीत गणेश जयंती उत्सवानिमित्त धार्मिक, सांस्कृतिक, सामुदायिक विवाह, आरोग्य शिबिराबरोबरच विविध कार्यक्रम

नगर – दातरंगे मळा येथील एकदंत कॉलनीत गणेश जयंती उत्सवानिमित्त धार्मिक,सांस्कृतिक, सामुदायीक विवाह, आरोग्य शिबिराबरोबरच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंडळाचे हे २१ वे वर्षेअसून दर वर्षी गणेश जयंती उत्सव उत्साहात पार पडतो. तसेच विविध कार्यक्रमांनी व सामाजिक उपक्रमांनी या उत्सवाची शोभा वाढते. या गणेश जयंती निमित्त मंडळाच्यावतीने सामुदायिक विवाह सोहळा करण्यात येतो. यामध्ये दरवर्षी ३–४ जोडप्यांचा विवाह लावण्यात येतात. तसेच जयंती उत्सवाचे औचित्याने रक्तदान शिबीर, नेत्र, दंत, आरोग्य तपासणी, मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीर, १०० गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप असे सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. या जयंती उत्सवास हजारो लोक दर्शनासाठी गर्दी करुन महाप्रसादाचा लाभ घेतात. एकदंत गणेश मंदिर, मंडळाचे सर्व सदस्य व एकदंत परिवार व एकदंत महिला मंडळ यासाठी विशेष परिश्रम घेतात.



एकदंत गणेश गणेश जयंती उत्सव १ फेब्रुवारी रोजी असून त्यानिमित्त २६ जानेवारी रोजी स.९ वा.दिप प्रज्वलनाने गणेश जयंती उत्सवास स.९ वा. प्रारंभ होईल., स.१० ते दु.५ पर्यंत रक्तदान शिबीर (आनंदऋषीजी ब्लड बँक). २७ जानेवारी रोजी सकाळी १० ते दु.४ मोफत आरोग्य, नेत्र तपासणी, मोतिबिंदू शस्त्रक्रिया, दंत तपासणी, औषध वाटप शिबीर, २८ जानेवारी रोजी दु.१२ वा. शालेय १०० गरजु विद्यार्थ्यांना दप्तर वाटप, रात्री ८ ते १० अंताक्षरी स्पर्धा (खुला गट), २९ जानेवारी रोजी संध्या. ७ ते रा.१० वा. हनुमान चालिसा (श्री रामभक्त हनुमान सत्संग मंडळ), ३० जानेवारी रोजी संध्या. ७ ते रा.१० वा. रंगारंग कार्यक्रम (डान्स मनोरंजन), ३१ जानेवारी रोजी संध्या.७ ते रा.१० वा.हळदी कुंकु समारंभ (एकदंत महिला मंडळ) व सांस्कृतिक कार्यक्रम बत्काम्मा असे सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम होईल.

श्री गणेश जयंतीदिनी १ फेब्रुवारी रोजी स.७ ते ९ श्री विघ्नेश्वर पूजन व श्री गणपती अथर्व शिर्षन, नाममुर्ती अभिषेक, स.९ ते १०.३०, होम हवन, स.९ ते दु.१२ 'श्री'च्या मुर्ती मिरवणुक व पुर्णाहुती, स.१० ते दु.१ श्री सत्यनाराण महापूजा, दु.१.२१ वा. सामुदायिक विवाह सोहळा, दु.१.३० ते ३ महाप्रसाद (भंडारा), दु.४ ते सायं.७ यावेळेत लहान बालकांसाठी गंमत जंमत व बाल मेळावा, असे कार्यक्रम होतील तरी भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन एकदंत गणेश मंडाळ व श्री एकदंत महिला बचत गटाच्या सर्व कार्यकर्त्यांनी केले आहे.

यावर्षी उत्सवाचे २१ वे वर्ष असल्याने श्रीतिर्थक्षेत्र तिरुमला तिरुपती बालाजी प्रतिकृती सजावट श्री एकदंत गणेश मंदिरावर करण्यात येणार आहे.

---

# नॅशनल लेव्हल अॅबॅकस स्पर्धेत ग्रेड प्लसचे ५ विद्यार्थी चमकले

## प्रतिक शेकटकर व शाहीन शेकटकर यांचा बेस्ट टीचर अॅवॉर्डने गौरव

नगर – येथील ग्रेड प्लस अकॅडमीचे पाच विद्यार्थी पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या नॅशनल लेव्हल अबॅकस स्पर्धेत चमकले. संचालक प्रतिक शेकटकर आणि संचालिका शाहीन शेकटकर यांना बेस्ट टीचर अवॉर्ड देऊन सन्मान करण्यात आला.

गुणवंत विद्यार्थ्यांसह बेस्ट टीचर अवॉर्ड प्राप्त शेकटकर दांम्पत्यांचा सत्कार राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर व माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे यांच्या हस्ते झाला. यावेळी सुनिल शेकटकर, रईस शेख, कुणाल शेकटकर, विजय भोसले आदींसह सर्व पालक व विद्यार्थी उपस्थित होते.



नॅशनल लेव्हल अबॅकस स्पर्धेत ग्रेड प्लस अकॅडमीचे पाच विद्यार्थी चमकले.

नॅशनल लेव्हल अबॅकस स्पर्धेत पार्श बंब याने (लेवल ६) या गटा मध्ये द्वितीय क्रमांक, राजवीर थोरात आणि अन्वी खरमाळे यांनी (ज्युनिअर लेवल) अनुक्रमे चौथा आणि पाचवा क्रमांक पटकवाला. स्वप्रीत गुंड याने (लेवल १ अ) व सचिन पाटील याने (लेवल १ ब) चौथा क्रमांक पटकावला. या सर्व विद्यार्थ्यांना अकॅडेमीचे प्रतिक शेकटकर व शाहीन शेकटकर यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रांजली भांडवलकर व संचिता शिंदे यांनी केले.

---

# शासकीय रेखाकला परीक्षेत विधाते विद्यालयाचे यश

## शंभर टक्के निकाल; गौरी थोरात व करण रोडे 'अ' श्रेणीत उत्तीर्ण

नगर – महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या शासकीय रेखाकला परीक्षेत (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा) सारसनगर येथील कै. दामोदर विधाते (मास्तर) माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला असून, एलिमेंटरी मध्ये गौरी यशवंत थोरात व करण हनुमंत रोडे अ श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.





एलिमेंटरी परीक्षेत दहा तर इंटरमिजिएट परीक्षेसाठी ३० विद्यार्थी बसले होते. त्यापैकी सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एलिमेंटरी परीक्षेत अ व ब श्रेणीत प्रत्येकी २ विद्यार्थी तर क श्रेणीत ६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. इंटरमिजिएट परीक्षेत ७ विद्यार्थी ब श्रेणीत तर २३ विद्यार्थी क श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

---

### गणित–विज्ञान प्रदर्शनात वि. ल. कुलकर्णी शाळेची कामगिरी

नगर – सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षाचे ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान–गणित प्रदर्शनात विश्वास लक्ष्मण कुलकर्णी प्राथमिक शाळेतील इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी कु. किशोरी गणेश सुपेकर हिच्या गणिताच्या मॉडेलला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

शाळेतील उपशिक्षिका श्रीमती मीरा सखाराम वाव्हळ यांनी मांडलेल्या 'अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्यास' प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले. त्यांच्या साहित्याची जिल्हास्तरासाठी निवड झाली आहे.

---

**कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालय, अहिल्यानगर**

ई–मेल अॅड्रेस:– nagartahsildar@gmail.com
दूरध्वनी क्रमांक:– ०२४१–२४११६००
क्र. कावि/ Mag–२/४६३/२०२४
अहिल्यानगर दि. १५/०१/२०२५

## जाहीर नोटीस

फौजिया अन्सार शेख
कोठला स्टँड, ता.जि. अहिल्यानगर } वादी
विरूद्ध
अधिकारी, जन्म–मृत्यू नोंदणी विभाग,
अहिल्यानगर महानगरपालिका,
अहिल्यानगर } प्रतिवादी

ज्याअर्थी अर्जदार यांनी सदरचा अर्ज जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३(३) अन्वये मा. तहसीलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार फौजिया अन्सार शेख यांची सासु नामे जुबेदा अन्वर शेख यांचा दि. ०६/०७/२०१८ रोजी मृत्यू झालेला आहे. त्यांचे मृत्यूची नोंद प्रतिवादी यांच्याकडे होऊन तसा मृत्यू प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी अर्जदार फौजिया अन्सार शेख यांची सासु नामे जुबेदा अन्वर शेख यांचा मृत्यू झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुराव्यानिशी मा. तहसीलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात कळवाव्यात. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार नामे जुबेदा अन्वर शेख यांचे मृत्यूची नोंद प्रतिवादी यांच्याकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकूम करतील. मग त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही.

येणेप्रमाणे आज दि. १५/०१/२०२५ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली असे.

**तहसीलदार अहिल्यानगर करिता**

---

**कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालय, अहिल्यानगर**

ई–मेल अॅड्रेस:– nagartahsildar@gmail.com
दूरध्वनी क्रमांक:– ०२४१–२४११६००
क्र. कावि/ Mag–२/७००/२०२५
अहिल्यानगर दि. १७/०१/२०२५

## जाहीर नोटीस

वर्षा शेषमल कटारिया
भवानीनगर, बुरुडगाव रोड,
ता. जि. अहिल्यानगर
विरूद्ध
अधिकारी, जन्म–मृत्यू नोंदणी विभाग,
अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

ज्याअर्थी अर्जदार यांनी सदरचा अर्ज जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३(३) अन्वये मा. तहसीलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार वर्षा शेषमल कटारिया यांचे स्वतः नामे वर्षा शेषमल कटारिया यांचा दि. ०९/१०/१९७१ रोजी जन्म झालेला आहे. त्यांचे जन्माची नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसा जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी अर्जदार वर्षा शेषमल कटारिया यांची स्वतः नामे वर्षा शेषमल कटारिया यांचा जन्म झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुराव्यानिशी मा. तहसीलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात कळवाव्यात. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार नामे वर्षा शेषमल कटारिया यांचे जन्माची नोंद प्रतिवादी यांच्याकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकूम करतील. मग त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही.

येणेप्रमाणे आज दि. १७/०१/२०२५ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली असे.

**तहसीलदार अहिल्यानगर करिता**

---

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली जमीनीचे विद्यमान मालक **सय्यद ओबेसोद्दीन जमिलोद्दीन रा. १४२९/३२, हवेली, मंगलगेट, अहमदनगर**. यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर जमीनीचे विक्री करण्याचा करार करून आमचे अशिलांबरोबर कायम खुष खरेदी देण्यांचे ठरवून आमच्या अशिलाकडुन विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोरीत असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीन मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी व तालुका नगरपैकी, जिल्हापरिषद हद्दीतील मौजे **जेऊर** येथील मे. दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कक्षेतील हंगामी बागायत शेतजमीन मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे–

| ग.नं. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|
| | हे. आर. | रु. पै. |
| १३६/१३७/२ | जि. ०.६८ | ४.५० |
| | बा. ०.४९ | |
| | १.१७ | |

यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीची उत्तरेकडील बाजुची ० हे २२ आर पैकी ० हे १२ आर जमीनी बाबत.

**यांसी चतु:सिमा :**

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | – | गट नं. १३६/१३७/२ पैकी अंतर्गत रस्ता |
| दक्षिणेस | – | गट नं. १३६ / १३७/२ पैकी क्षेत्र |
| पश्चिमेस | – | गट नं. १३५ व १३६/१३७/२ पैकी क्षेत्र |
| उत्तरेस | – | रस्ता |

येणेप्रमाणे चतुः समापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि १७/०१/२०२५
अहमदनगर

**अॅड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**अॅड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८

---

# नगर शहरामध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चषक कराटेचा महामुकाबला

## शहर शिवसेनेने स्विकारले आयोजनपद, रिपब्लिक कपसाठी भिडणार १५ राज्यांतील ८३० खेळाडू

नगर – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चषक इंडियन ओपन रिपब्लिक कप कराटे चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेचे आयोजन १८ आणि १९ जानेवारी रोजी अहिल्यानगर येथील वाडियापार्क क्रीडा संकुल येथे होणार आहे. युथ कराटे फेडरेशन व स्पोर्ट्स ओके यांच्या संयुक्त विद्यमाने होत असलेल्या सदरच्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत १५ राज्यांतील ८३० खेळाडू सहभागी होणार आहेत. या स्पर्धेचे आयोजनपद शहर शिवसेनेने स्विकारले असल्याची माहिती १६ जानेवारी रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत जिल्हा प्रमुख अनिल शिंदे व शहर प्रमुख सचिन जाधव यांनी दिली. यावेळी युवा सेना प्रमुख पै. महेश लोंढे, साहिल सय्यद, सबिल सय्यद आदी उपस्थित होते.

विजेत्यांसाठी मोठी रोख बक्षिसे आणि आकर्षक ट्रॉफी ठेवण्यात आली असल्याची माहिती साहिल सय्यद व सबिल सय्यद यांनी दिली. स्पर्धेचे थेट प्रक्षेपण स्पोर्ट्स ओके या ओटीटी प्लॅटफॉर्मवर केले जाणार असून, प्रेक्षकांना घरी बसून या रोमांचक स्पर्धेचा आनंद लुटता येणार आहे. या स्पर्धेत ८, १०, १२, १४, १८ वर्षांखालील व १८ वर्षांवरील वगोगटात विविध वजनगटात स्पर्धा होणार आहे.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चषक इंडियन ओपन रिपब्लिक कप कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

प्रत्येक वयोगटातील विजेत्यास ५ हजार रोख व सर्वात जास्त सुवर्णपदक जिंकणाऱ्या संघाला ५१ हजार रुपये रोख रक्कम प्रदान करण्यात येणार आहे. मागील वर्षी झालेल्या पहिल्या स्पर्धेत महाराष्ट्र संघाने विजेतेपद पटकावले होते, तर कर्नाटक आणि गुजरात यांनी अनुक्रमे दुसरे व तिसरे स्थान मिळवले होते. यंदाच्या स्पर्धेत कोणता संघ विजयी होईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन ना. राधाकृष्ण विखे पाटील व आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते होणार आहे. तर यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे आणि अमोल खताळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. शिवसेना व अहिल्यानगर रुरल अॅण्ड अर्बन कराटे असोसिएशन यांच्या सहकार्याने ही स्पर्धा होणार आहे.

---



भिंगारमध्ये चौण्डेश्वरी शाकंभरी नवरात्र व पौष पौर्णिमा महोत्सवाची धार्मिक कार्यक्रम व पालखी मिरवणुकीने सांगता

# भिंगारमध्ये चौण्डेश्वरी शाकंभरी नवरात्र व पौष पौर्णिमा महोत्सवाची सांगता

नगर – भिंगार येथील देवांग कोष्टी समाजाच्या वतीने श्री चौण्डेश्वरी माता शाकंभरी नवरात्र व पौर्णिमा महोत्सव उत्साहात झाला. विविध धार्मिक कार्यक्रम झाले. विधिवत घटस्थापना, चंडी यज्ञ, चौण्डेश्वरी मातेचा अभिषेक महापूजा, पालखी मिरवणूक आदी कार्यक्रम, तसेच विद्यार्थी गुणगौरव कन्यारत्न व समाजभूषण पुरस्कार वितरण करण्यात आल्याचे अध्यक्ष शिवम भंडारी यांनी सांगितले.

महोत्सवानिमित्त परिसरातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीच्या अग्रभागी बालवारकरी सहभागी झाले होते. त्यांनी टाळ मृदंग व हरिनामाचा गजर केला. अवघे वातावरण भक्तिरसात न्हावून निघाले. मिरवणुकीत ज्येष्ठ दत्ता लोखंडे, शंकर खरपे, पांडुरग आसलकर, श्यामराव दिवटे, उमाकांत आस्मर, रमेश बोंदर्डे, अशोक बोंदर्डे आदींसह समाजबांधव सहभागी झाले होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी अध्यक्ष शिवम भंडारी, गणेश उपरे, किशोर उपरे, अनिल सोळसे, संदीप टेके, विजयकुमार भंडारी, पवन बोंदर्डे, दीपक बोंदर्डे, बाळकृष्ण कुमठेकर, देविदास कुमठेकर, राहुल लिपारे, दीपक चिनके, माऊली दिघे, राजू कुरकुटे, प्रवीण करपे, अनिल दिवटे, रामकिसन बाबर, अमोल उदबत्ते आदींनी प्रयत्न केले.

---

# वीज कामगार फेडरेशन, इंटकचे १८ जानेवारीला महाअधिवेशन

नगर – वीज कामगारांच्या प्रलंबित मागण्या शासनाकडून मान्य करवून घेणेकामी इंटक फेडरेशनचे पुणे येथे १८ जानेवारी रोजी सकाळी १२ वा. राज्यस्तरीय महाअधिवेशन होणार आहे.

म.रा राष्ट्रीय वीज कामगार फेडरेशन, इंटकचे १९ वे राज्यस्तरीय महाअधिवेशन आ. भाई जगताप यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून प्रमुख पाहुणे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आ. नाना पटोले, आ.विश्वजित कदम, आ. संग्राम थोपटे, आ. संजय जगताप उपस्थित राहणार असून प्रमुख उपस्थितीत लोकेश चंद्रा अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, डॉ. संजीवकुमार अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण डॉ. पी. अन्बलगन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महानिर्मिती, सुगत गमरे संचालक (मा.सं.) महापारेषण अरविंद भादीकर संचालक (संचलन/मा.सं.) महावितरण तसेच तीनही कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या महाअधिवेशनात वीज कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर चर्चा होऊन ठराव मांडण्यात येणार आहेत. सदर प्रलंबित मागण्यांची शासनस्तरावर सोडवणूक होणेकरीता दिशा ठरविण्यात येणार आहे. इंटक फेडरेशनच्या केंद्रीय राज्य कार्यकारिणीच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व वीज कामगारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

# जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेसाठी नगरचा फूटबॉल संघ हिंगोलीला रवाना

### पहिला सामना यवतमाळ बरोबर रंगणार

नगर – नगर जिल्ह्याचा फुटबॉल संघ बसमतनगर (जि. हिंगोली) येथे होणाऱ्या जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेसाठी रवाना झाला आहे. संघाचा पहिला सामना यवतमाळ जिल्हा संघाविरुद्ध होणार आहे.

या संघाची निवड नुकतेच झालेल्या लीग अजिंक्यपद स्पर्धेतून करण्यात आली आहे. अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेचे मानद सचिव रोनप फर्नांडिस यांनी या खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेसाठी नगर जिल्ह्याचा फुटबॉल संघ संघ हिंगोलीला रवाना झाला.

जिल्ह्याच्या संघात शशांक वाल्मिकी (कर्णधार), अक्षय बोऱ्हाडे, अभिषेक भांबळ, योगेश चेमटे, रितेश रानमळे, ऋतीक छजलानी, मयूर गोरखा, प्रदीप सिंग, रौनक जाधव, ऋषी कनोजिया, सार्थक भोसले, हिमांशू थोरात, सुयोग महागडे, ओम दंडवते, तनिष गायकवाड, अरमान फकीर, यश कोठले, ऋषभ मणी, जॉय शेलके, अरमान शेख, साहिल उरमुडे, नवाज रऊफ शहा यांचा समावेश आहे.

संघ व्यवस्थापक राजू पाटोळे व प्रशिक्षक सुभाष कनोजिया यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याचा संघ सदर स्पर्धेत सहभागी झाला आहे. या संघाची निवड विक्टर जोसेफ, राजू पाटोळे, खालिद सय्यद व सुभाष कनोजिया यांच्या निवड समितीने केली आहे.

या स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचे जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष जोगा सिंग मिन्हास, खालिद सय्यद, खजिनदार रिशपालसिंग परमार यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## 'झिरो' बनतंय लाडकं पर्यटनस्थळ

भारताच्या चारही दिशांना निसर्गसौंदर्याने नटलेले प्रदेश आहेत. त्यातही ईशान्य भारतातील हिरव्यागार व सांस्कृतिक वैविध्याने नटलेल्या प्रदेशाची पर्यटकांना अधिक भुरळ पडते. ईशान्य भारतात असलेल्या अरुणाचल प्रदेशात एक झिरो नावाचे ठिकाण आहे. या झिरो नावापासूनच त्याबद्दलचे कुतूहल जागृत होते. या प्रदेशातील संस्कृतीही भारताच्या इतर प्रदेशापेक्षा थोडी वेगळी आहे. मेघालय, मिझोरम, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश अशा भारताच्या उत्तर-पूर्वेकडे असलेल्या राज्यांचे निसर्गसौंदर्य काही वेगळेच आहे. या प्रदेशातील संस्कृतीही भारताच्या इतर प्रदेशापेक्षा थोडी वेगळी आहे. यातीलच अरुणाचल प्रदेश हे अतिशय सुंदर राज्य असून दरवर्षी तिथे अनेक पर्यटक भेट देतात. अरुणाचल प्रदेशमध्येच एक झिरो नावाचे ठिकाण आहे. ते एक हिल स्टेशन असून तिथे फिरायला येणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे सुंदर डोंगररांगांमध्ये वसलेल्या या ठिकाणी निसर्गरम्य दृश्य पर्यटकांचे लक्ष वेधून घेतात. हे ठिकाण छोटे असले तरी तेथील सौंदर्य लोकांना भुरळ पाडते.



समुद्रसपाटीपासून ५५३८ फूट ते आठ हजार फूट उंचावर हे ठिकाण आहे. देशभरातील अनेक पर्यटक झिरो या पर्यटनस्थळाला भेट देतात, मात्र अरुणाचल प्रदेशात फिरण्यासाठी तिथल्या सरकारकडून इनर लाइन परमिट घ्यावे लागते. त्यासाठी ऑनलाइनही अर्ज करता येऊ शकतो. झिरो या ठिकाणी अनेक छोटी छोटी आदिवासी गावं आहेत. अनेकविध जातीजमातींची घरे त्या प्रदेशात वसलेली आहेत. त्यापैकी काही भटके असून ते सतत आपली घरे बदलत असतात. तिथे राहणाऱ्या लोकांची जीवनशैली, त्यांची भाषा, बोली, शारीरिक ठेवण, खाद्यसंस्कृती हे सर्वच इतरांपेक्षा वेगळे आहे.

झिरो या पर्यटनस्थळाजवळच झिरो-प्लूटो हे शहर डोंगराळ भागालगत आहे. तिथून शहराचा सुंदर दृश्य दिसते. झिरो या ठिकाणी असलेलं सिद्धेश्वर नाथ मंदिरही पाहण्यासारखे आहे. पर्यटक आवर्जून या मंदिराला भेट देतात. या मंदिरात २५ फूट उंच आणि २२ फूट लांब असलेले शिवलिंग आहे. त्यामुळे इथे भक्तांची रीघ लागलेली असते. झिरो हे निसर्गाच्या कुशीत वसलेले ठिकाण आहे. तेथील लोकसंख्याही अगदी कमी आहे. ते ठिकाण घनदाट जंगल, मोठमोठे पर्वत आणि हिरवीगार भातशेती अशा परिपूर्ण निसर्गाने वेढलेले आहे.

## आणली सून, निघाली मुलगी!



लग्नसोहळ्यात सुनेच्या रूपात मुलगी आणि जावयाच्या रूपात मुलगा मिळतो. सासू सुनेचं नातं तसं बदनामच...पण काळ बदलला आहे. आता सून ही पण मुलगी असते. आता एका लग्नाची अजब गोष्ट समोर आली आहे. सासू आपल्या लेकासाठी सून आणायला गेली आणि हे काय तिला कळलं की, ही आपली हरवलेली मुलगीच आहे. आता मुलगा आणि मुलीचे लग्न कसं होणार असा प्रश्न तुम्हाला पडला असेल ना...यात पण एक ट्विस्ट आहे. कुठे घडला हा विचित्र प्रकार आणि पुढे नेमकं काय झालं पाहूयात.


ही घटना चीनमधील एका लग्नात घडली. होणारी सून ही मुलगी असल्याच सासूला कळल्यानंतर त्याला जबरदस्त धक्का बसला. लेकाचं लग्न म्हटलावर वरमाय अगदी आनंदात होती. घरात एका सुनेच्या रूपात मुलगी येणार असल्याने सर्वत्र आनंदाचं वातावरण होतं. वाजतगाजत वरात नवरी मुलीकडे पोहोचली. तिथेही लग्नाची लगबग सुरू होती. जशी वरात सुनेच्या दारी पोहोचली तशी होणारी सून सासू आणि नवरदेवाच्या स्वागतासाठी स्वत: हजर झाली. त्यावेळी होणारी सून पाहून सासूच्या चेहऱ्यावर आनंद होता. पण, त्यावेळी वरमायचे लक्ष वधूचा हातावरील एका खूणकडे गेलं. त्यावरून सासूला भूतकाळातील गोष्ट आठवली. सासूने सुनेच्या घरातील मंडळींना तिच्याबद्दल विचारपूस सुरू झाली. त्यानंतर अनेक धक्कादायक खुलासे झाले. लग्नाच्या दिवसापर्यंत सासूला आपल्या सुनेच हे सत्य माहिती नव्हतं. नवरीच्या आई-वडिलांनी सांगितलं की, त्यांना ही मुलगी रस्त्याच्या कडेला सापडली होती. त्यानंतर आम्ही तिला दत्तक घेतलं आणि लहानचं मोठं केलं. त्यानंतर वरमायने २० वर्षांपूर्वी आपली मुलगी हरवली होती आणि ती मुलगी हीच आहे, तिच्या जन्म खुणावरून ही सिद्ध होतं. ते कळल्यावर सगळ्यांना एकच धक्का बसतो. खास करून नवरी मुलगी आणि मुलगा यांना. होणारी सासू आपली आई आहे,असे या तरुणीला समजले आणि तिचीर'अश्रुनीर वाहे डोळा' अशी अवस्था झाली. या आनंदाची बातमीसोबत आता लग्न कसं होणार हा प्रश्न होता. पण, थांबा ही कहाणी इथेच संपत नाही. यानंतरही त्या दोघांचं लग्न झालं. झालं असं की, या दोन्ही कुटुंबाने एकमेकांपासून काही गोष्टी लपवल्या होत्या. जशी नवरी मुलगी ही त्या कुटुंबातील दत्तक मुलगी होती. तशीच नवऱ्या मुलाच्या आईने आपली मुलगी हरवल्यानंतर एक मुलगा दत्तक घेतला होता. तोच हा नवरा मुलगा होता. अखेर दोघांनाही दत्तक घेतले असल्याने त्यांच्यात पूर्वीचे कोणतेही नाते नव्हते हे निश्चित झाले आणि मग या दोघांचे लग्न मोठ्या लावण्यात आले. चिन्यांच्या देशात काहीही घडू शकते!

## आयुर्मान सांगणारे जैवघड्याळ

स्वतःचे आयुष्य किती असेल याबाबत अनेक लोकांना कुतूहल असते. आता ते जाणून घेण्यासाठी एक वैज्ञानिक मार्गही शोधण्यात आलेला आहे. ब्रिटनच्या एडिंबर्ग विद्यापीठातील संशोधकांनी असे जैवघड्याळ शोधलेले आहे ज्यातून एखादी व्यक्ती नेमकी किती जगणार याचा ठोस अंदाज येऊ शकेल.



आयुष्यभरात डीएनएमध्ये होणारे रासायनिक बदल त्या व्यक्तीचे आयुष्य किती असेल हे सांगत असतात. प्रत्येकाचे प्रत्यक्ष वय व अंदाजे सांगितलेले जैविक घड्याळातील वय यांची तुलनाही वैज्ञानिकांनी केलेली आहे. चार स्वतंत्र अभ्यासात १४ वर्षांमध्ये पाच हजार लोकांच्या जैविक वयाचा अभ्यास त्यांच्या रक्ताचे नमुने घेऊन करण्यात आला व त्यांचा बराच काळ मागोवा घेण्यात आला. जे जैविक घड्याळ वेगाने पळते त्यात त्या व्यक्तीचा मृत्यू लवकर होतो व धूम्रपान, मधुमेह व हृदयरोग यांचाही विचार त्यात केला आहे. एडिंबर्ग विद्यापीठाच्या वैज्ञानिकांनी ऑस्ट्रेलिया व अमेरिकेतील वैज्ञानिकांच्या मदतीने डीएनएतील रासायनिक बदल म्हणजे मेथिलेशनचा विचार करून यातील प्रत्येक व्यक्तीचे जैविक वय मोजले आहे. मेथिलेशन बदलांमुळे जनुकांवर कायमचे परिणाम होतात. एडिंबर्ग सेंटर फॉर कॉग्निटिव्ह एजिंग अँड कॉग्निटिव्ह एपिडिमियॉलॉजी या संस्थेचे डॉ. रिकार्डो मारियोनी असे म्हटले आहे की, चारही अभ्यासात सारखेच निष्कर्ष मिळाले असून जैविक घड्याळाचा मृत्यूशी संबंध असतो. जैविक वयाच्या अंदाजावर जीवनशैली परिणाम करते की जनुकीय घटक परिणाम करतात हे स्पष्ट करण्यात आलेले नाही. त्याचा अभ्यास स्वतंत्र संशोधनात केला



जाणार आहे. मुख्य संशोधक आयन डिअरी यांनी सांगितले की, दीर्घायुष्याबाबत आपले ज्ञान यामुळे वाढणार असून वृद्धत्व कसे वाढत जाते याचाही उलगडा होणार आहे. केवळ जास्त आयुर्मान असण्याबरोबरच निरोगी जीवनही असले पाहिजे. वृद्धत्वाच्या निजखुणा दाखवून आपण नेमके किती जगणार याचा अंदाज देणारे हे जैविक घड्याळ नक्कीच महत्त्वाचे आहे.




अंतराळाच्या अनंत पसाऱ्यात अनेक अद्भुत गोष्टी पाहायला मिळतात. आपल्या आकाशगंगेतून प्रतिसेकंद १२०० कि.मी. वेगाने जाणारा ताराही खगोलवैज्ञानिकांनी शोधला आहे. हा तारा कुठे चालला आहे, हे त्यांनाही माहिती नाही; पण त्याचे नाव 'यूएस ७०८' असे आहे. आकाशगंगेत एवढ्या प्रचंड वेगाने मार्गक्रमण करणारा पदार्थ प्रथमच दिसला असून, त्याचा वेग एवढा प्रचंड असण्याचे कारण म्हणजे त्याला गुरुत्वाचे वेसण नाही व त्यामुळेच तो आकाशगंगेबाहेर चालला आहे. यूएस ७०८ हा तारा पहिल्यांदा सौरमालेतील द्वैती ताऱ्याचा एक भाग होता व त्यातील एक श्वेतबटू तारा होता.

श्वेतबटू तारा हा नंतर अण्वौष्णिक नवतारा बनला व त्याचा स्फोट झाला त्यातून यूएस ७०८ या ताऱ्याला गती मिळाली व तो अवकाशात सुसाट वेगाने जाऊ लागला. आंतरराष्ट्रीय चमूने या ताऱ्याच्या द्वैती स्वरूपावर प्रकाश टाकला असून, त्यात अण्वौष्णिक स्फोट होऊ शकतात, हे दाखवले आहे. या प्रकारचे नव तारे दीर्घिकांमधील अंतर मोजण्यासाठी वापरले जाऊ शकतात व विश्वाचे बदलते रूप तसेच प्रसार होण्याबाबत माहिती मिळते. हवाई बेटांवरील मऊई येथील माऊंट हालेकाला पॅन स्टार्स१ दुर्बिणीच्या मदतीने हा तारा शोधण्यात आला. गेली ५९ वर्षे या ताऱ्याची माहिती गोळा करण्यात आली. त्या ताऱ्याची त्रिमिती गती मोजण्यातही त्यामुळे यश आले व तो आकाशाच्या प्रतलातून किती वेगाने जात आहे हे समजले.

बेलफास्ट येथील क्वीन युनिव्हर्सिटीच्या खगोलभौतिकी केंद्राच्या डॉ. रुबिना कोटक यांनी सांगितले की 'ला' प्रकारातील अण्वौष्णिक स्फोट होणाऱ्या ताऱ्यांचे गूढ त्यामुळे उलगडणार आहे. श्वेतबटू ताऱ्यांमध्ये स्फोटानंतर ते 'ला' स्वरूपातील नवताऱ्यात रूपांतरित होतात; पण आजपर्यंत त्याची खातरजमा होत नव्हती, आता ती झाली आहे. किंबहुना त्याचे पुरावे मिळाले आहेत. असे संशोधक चमूचे प्रमुख व युरोपियन सदर्न ऑब्झर्वेटरीचे (वेधशाळेचे) स्टीफन गियर यांनी सांगितले.

## नाज्का लाईन्समध्ये एलियन्स?

पेरू देशातील वाळवंटी मैदानात प्राचीन काळात भव्य रेषांच्या सहाय्याने काही आकृत्या निर्माण करण्यात आलेल्या आहेत. त्यांना 'नाज्का लाईन्स' म्हणून संबोधले जात असते. या आकृत्या आकाशातून किंवा उंच ठिकाणांवरून पाहिल्यावरच समजतात. अशा भव्य आकृत्या व आखीव सरळ रेषांची कशी निर्मिती झाली, याचे कुतूहल आजही कायम आहे. आता 'एआय' म्हणजेच 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'च्या सहाय्याने तिथे यापूर्वी पाहण्यात न आलेल्या तीनशेपेक्षाही अधिक नाज्का लाईन्स शोधण्यात आल्या आहेत. त्यामध्ये चक्क एलियनसारख्या दिसणाऱ्या काही मानवाकृतींचाही समावेश आहे. शिवाय ७२ फूट लांबीची व तोंडात चाकू धरलेल्या किलर व्हेलचीही आकृती यामध्ये आहे.

या परिसरात आजपर्यंत ज्ञात असलेल्या आकृत्यांच्या दुप्पट नव्या आकृत्या केवळ सहा महिन्यांच्या काळात 'एआय'च्या सहाय्याने शोधण्यात आल्या आहेत. पेरूच्या नाज्का वाळवंटातील सपाट मैदानात ४४० चौरस किलोमीटरच्या परिसरातील जमिनीवर या मानवनिर्मित कोरीव आकृत्या आहेत. इसवीसनपूर्व २०० ते इसवी सन ५०० या काळात त्यांची निर्मिती झाली असावी, असे अनुमान आहे. सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी या भव्य आकृत्या त्यावेळेच्या मानवांनी कशा बनवल्या असाव्यात व त्या अधिक उंचीवरून पाहण्याची सुविधा त्यांना कशी मिळाली असावी, हे एक गूढच आहे. इंका संस्कृतीच्या पूर्वकालीन मानवांनी या आकृत्या बनवल्या असून, त्यांना नाज्का संस्कृती असे म्हटले जाते. १९२० च्या दशकात विमानातून जाणाऱ्या प्रवाशांना सर्वप्रथम अशा आकृत्या तिथे आढळल्या व ते चकितच झाले. त्यानंतर संशोधकांनी



तिथे अशा ४२० आकृत्या शोधल्या होत्या. त्यापैकी बहुतांश आकृत्या या गेल्या वीस वर्षांमध्ये सॅटेलाईटच्या मदतीने शोधण्यात यश आले होते. सध्या अनेक आकृत्या पुसट झाल्याने त्या मानवी स्पष्ट डोळ्यांनी दिसणे कठीण बनले आहे.

आता झालेल्या नव्या संशोधनाची माहिती 'पीएनएएस' या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. या संशोधनासाठी एका एआय मॉडेलचा वापर करण्यात आला. या मशिनला सॅटेलाईट छायाचित्रांमधील पुसट झालेल्या रेषा, आकृत्या आणि अधूनमधून निसटलेले भाग जोडून अशा आकृत्या शोधण्यासाठी प्रशिक्षण दिले होते. मानवापेक्षा वीस पट अधिक वेगाने अशा लाईन्स शोधण्याची क्षमता या मशिनमध्ये होती. त्याने या नव्या आकृत्या शोधल्या व संशोधकांनी सप्टेंबर २०२२ ते फेब्रुवारी २०२३ या काळात प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन अशा ३०३ आकृत्यांची पुष्टीही केली. त्यामध्ये मानवी आकृत्या, डोकी, मासे, पक्षी, मांजर, समारंभाचे दृश्य, मानव-पशू संपर्क अशा आकृत्यांचा समावेश आहे. यामध्ये चक्क एलियनसारख्या वाटणाऱ्या मानवी आकृत्यांचाही समावेश आहे, हे विशेष!

## बुडबुड्याने श्वास घेणारा सरडा

जगभरात सरड्यांच्याही अनेक प्रजाती आहेत. त्यापैकी 'स्कुबा-डायव्हिंग लिझार्डस्'नी पाण्याखाली जाऊन शत्रूपासून बचाव करण्यासाठी एक अनोखे कौशल्य विकसित केलेले आहे. त्यांना आपल्या कपाळ व तोंडाच्या मधल्या भागावर हवेचा बुडबुडा बनवता येतो व त्याच्या सहाय्याने ते पाण्याखाली श्वास घेत दीर्घकाळ राहू शकतात.



२०१८ मध्ये संशोधकांनी अशा सेमी-ॲक्वॅटिक म्हणजेच अर्धजलीय सरड्याचे चित्रीकरण करण्यात यश मिळवले होते. त्याला स्ट्रीम अनोल असे नाव असून वैज्ञानिक भाषेत त्याला 'अनोलिस ऑक्सिलोफस' असे म्हटले जाते. हे सरडे तोंडावरील ऑक्सिजनयुक्त हवेच्या बुडबुड्याच्या सहाय्याने पाण्यात श्वास घेतात, असे आढळले. असा ऑक्सिजनचा साठा असलेला बुडबुडा बनवण्याची व त्याच्या मदतीने पाण्याखाली श्वास घेण्याची क्षमता अन्य सरड्यांमध्ये आढळत नाही. त्यावेळेपासून अशा अनोल सरड्यांच्या अन्य १८ प्रजाती शोधण्यात आल्या आहेत. त्यांच्यामध्येही असा बुडबुडा बनवण्याची क्षमता असते. यापैकी एक प्रजाती म्हणजे 'वॉटर अनोल' (अनोलिस ॲक्वाटिकस). पाण्याला दूर ठेवणाऱ्या त्वचेचा हा 'साईड इफेक्ट' आहे की त्याच्या सहाय्याने हे सरडे पाण्याखाली दीर्घकाळ राहू शकतात, याची माहिती संशोधकांना अद्याप नव्हती.

आता नव्या संशोधनात त्यांची ही पाण्याखाली श्वास घेण्याची 'ट्रिक' असल्याचेच निष्पन्न झाले आहे. या संशोधनाची माहिती 'बायोलॉजी लेटर्स' या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सुमारे तीस वॉटर अनोल्स सरड्यांवर याबाबतचे संशोधन करण्यात आले. ज्या अनोल सरड्यांकडे ही क्षमता असते ते अशी क्षमता नसलेल्या अनोल सरड्यांच्या तुलनेत ३२ टक्के अधिक काळ पाण्याखाली राहू शकतात, असे दिसून आले.

## पांडाच्या रूपात कुत्रा!

चीन आणि बनावटगिरी हे दोन आता पर्यायवाची शब्दच बनले आहेत. अगदी खेळण्यांपासून इलेक्ट्रिक सामानांपर्यंत सर्वच क्षेत्रात चीनने बनावट वस्तू घुसवल्या आहेत. भारतात चिनी वस्तूंवर बंदीही घालण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी चीनमधील एक प्रसिद्ध धबधबा चक्क पाईपमधून येणाऱ्या पाण्याचा असल्याचे एका व्हिडीओतून दिसून आले होते ! आता तर चीनने हद्दच पार केलीय. सोशल मीडियावर चीनमधल्या एका प्राणी संग्रहालयाचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. यामध्ये पांडाच्या रूपात तिथे एक कुत्रा ठेवला असल्याचे दिसून आले. हा व्हिडीओ चीनच्या शानवेई प्राणी संग्रहालयाचा असल्याचं सांगितलं जातंय. व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर प्राणी संग्रहालयावर मोठ्या प्रमाणावर टीका केली जाऊ लागली आहे.

व्हायरल होणाऱ्या या व्हिडीओत काही पर्यटक तिकिटं काढून प्राणी संग्रहालयात जातात. प्राणी संग्रहालयात पोहोचल्यानंतर पांडाला पाहून पर्यटक आनंदी होतात. पण, त्यांचा हा आनंद फार काळ टिकत नाही. कारण ज्या पांडाला पाहायला लोक आलेले असतात तो पांडा अचानक भुंकायला लागतो! हे पाहून पर्यटक चांगलेच हैराण होतात. व्हिडीओत एका पिंजऱ्यात दोन पांडा फिरताना दिसतात.



एका पांडाचे शरीर व चालणे श्वानासारखेच असते, तर दुसरा पांडा जीभ बाहेर काढून श्वास घेत बसल्याचे दिसते. त्यानंतर तो पांडा अचानक धुंकू लागतो. यामुळे काहीतरी गडबड असल्याचं लोकांच्या लक्षात आलं. भुंकल्यामुळे हे पांडा नाहीत तर श्वान असल्याचं पर्यटकांना कळलं. एका पर्यटकाने याचा व्हिडीओ बनवून तो सोशल मीडियावर व्हायरल केला. हा व्हिडीओ जगभरात व्हायरल झाला असून, चीनच्या बोगस धोरणावर टिका केली जात आहे. सोशल मीडियावर पेंटेड डॉग्स या नावाने हा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर शानवेई प्राणी संग्राहलयाने सुरुवातीला ही एक पांडा श्वान जात असल्याचा दावा केला. पण, जगभरातून टीका झाल्यानंतर तो पांडा नाही तर श्वान असल्याचे सांगून चूक मान्य केली. दोन श्वानांना पांडाच्या रंगात रंगवण्यात आलं होतं, असंही त्यांनी कबूल केलं. प्राणी संग्रहालयात ठेवण्यात आलेले हे श्वान चाऊ चाऊ स्पिट्ज ब्रिड जातीचे आहेत. मुख्यतः उत्तरी चीनमध्ये ते आढळतात. घोटाळा समोर आल्यानंतर संतापलेल्या पर्यटकांनी शानवेई प्राणी संग्रहालयाकडे तिकिटाचे पैसे परत मागितले; तर प्राणी संग्रहालयाकडून श्वान केवळ मनोरंजनासाठी ठेवण्यात आल्याचं स्पष्टीकरण देण्यात आलंय.

# शहरातील अरुंद रस्ते अन् त्यात अनधिकृतपणे अनेक ठिकाणी हिरवी चादर टाकून थडगे, मजारची निर्मिती

## अतिक्रमण तातडीने काढा : आ. संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली हिंदू बांधवांची मनपा आयुक्तांकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर – अहिल्यानगर शहरातील बालिकाश्रम रोडवर असणारे थडग्याचे अतिक्रमण काढावे या मागणीसाठी आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली हिंदू बांधवांनी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेतली. यावेळी आयुक्त यांनी १५ दिवसाची मुदत मागत लेखी आश्वासन आमदार संग्राम जगताप यांना दिले.



शहरातील अनेक अरुंद रस्ते, अनाधिकृत ठिकाणी हिरवी चादर टाकून थडगे, मजारची निर्मिती करुन केलेली अतिक्रमणे काढावीत या मागणीसाठी आ.संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली हिंदू बांधवांनी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेतली.

यावेळी सागर बेग, माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, भीमराव आव्हाड, राहुल सांगळे, बाली बांगरे, सचिन जगताप, मुळु गाडळकर, दिनेश जोशी, मंगेश खताळ आदी उपस्थित होते

निवेदनात म्हणाले की, अहिल्यानगर शहरातील सर्वच रस्त्यांवरील असलेली व वाढत चाललेली अवैध मजार आणि थडगे त्यामुळे शहरातील अनेक अरुंद रस्त्यावर आणि त्यात जाणूनबुजून काही विशिष्ट समाजाकडून अनाधिकृतपणे रस्त्याच्या कडेला अनेक ठिकाणी हिरवी चादर टाकून थडगे, मजार निर्माण केलेले आहेत तर व काही ठिकाणी तयार करण्याचे काम सुरू आहे. यामुळे आधीच अरुंद असलेले रस्ते यावर अशा प्रकारच्या अतिक्रमणांमुळे रस्त्याने जाण्या येण्यास मोठा अडथळा निर्माण होतो. तसेच या समाजाकडून या अवैध मजार, थडग्यावर काही कार्यक्रम घेतले जातात त्यावेळी पूर्ण रस्ते बंद केले जातात. या समाजाकडून अश्या प्रकारचे थडगे, मजार निर्माण करून त्या जागेवर वक्फ बोर्डाकडून या जागेवर हक्क सांगितला जातो. अशा प्रकारे रस्त्याची व सरकारी जागेवर अतिक्रमण करून या जागा गिळंकृत करण्याचा कट यामागे आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. तरी बालिकाश्रम रोडवरील थडग्याचे अतिक्रमण काढा अशी मागणी आयुक्तांकडे करण्यात आली.

# महापालिकेने सावेडी भागात स्मशानभूमीची सोय करावी

## मानवाधिकार सुरक्षा परिषदेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नगर – अहिल्यानगर व परिसराचा वाढता विस्तार लक्षात घेता सावेडी भागात स्मशानभूमीची सोय नसल्याने उपनगरांमधील नागरिकांना मृतदेह अंत्यसंस्कारासाठी नगरच्या अमरधाममध्ये आणावे लागते. लांबून प्रेतयात्रा आणताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. जिल्हाधिकाऱ्यांनी सावेडी भागात पालिका हद्दीतील जागेमध्ये स्मशानभूमीची सोय करावी, अशी मागणी विवेक तवले यांनी केली आहे.



आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषदेने महापालिका हद्दीत सावेडी भागात स्मशानभूमीची मागणी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे केली. (छाया – विजय मते)

आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषदेने जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत निवेदन दिले. याप्रसंगी राज्य दक्षिणचे अध्यक्ष विवेक तवले, अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष अमोल कोठारी, शहराध्यक्ष राजू अनमोल, मुख्य सचिव अनिल नगरकर, संयोजक जिल्हाध्यक्ष धनवान दिघे, रवींद्र वारुडे उपस्थित होते.

यावेळी पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना वस्तुस्थिती व परिस्थितीची जाणीव करून देताना उपनगरात स्मशानभूमी नसल्याने नागरिकांचे प्रेतयात्रा आणताना किती कसे हाल होतात. याची माहिती दिली. मरणानंतरही प्रेतयात्रेला त्रास सहन करावा लागतो. ही दुर्दैवी बाब असल्याचे स्पष्ट केले याबाबत जागा उपलब्ध होताच हा प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन जिल्हाधिकारी यांनी परिषदेच्या पदाधिकाऱ्यांना दिले.




मनपा अतिक्रमण विरोधी पथकाने बोल्हेगाव परिसरातील अतिक्रमणे हटविली. (छाया – बबलू शेख)

# बोल्हेगाव परिसरातील अतिक्रमणे हटविली

नगर – महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाकडून शहरातील अतिक्रमणांवर सातत्याने कारवाई केली जात असून, १७ जानेवारी रोजी बोल्हेगाव परिसरात असलेली अतिक्रमणे पथकाने जेसीबीच्या सहाय्याने हटविले आहेत.

बोल्हेगाव परिसरातील संभाजी कॉलनी, समर्थ कॉलनी येथील ओपन स्पेसमध्ये असलेले पत्र्याच्या शेडचे अतिक्रमण तसेच या शेडशेजारी असलेल्या बंद टपऱ्या, वॉल कंपाऊंडचे पक्के बांधकाम जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमण विरोधी पथकाने हटविले आहेत. या अतिक्रमणासंदर्भात आलेल्या तक्रारीनुसार सावेडी प्रभाग समितीने ही कारवाई केली आहे. या कारवाईत अतिक्रमण विभागाचे प्रमुख आदित्य बल्लाळ, उपअभियंता सुरेश इथापे, क्षेत्रीय अधिकारी अर्जुन जाधव, मुख्यालयातील क्षेत्रीय अधिकारी रिजवान शेख, राहुल साबळे यांच्यासह तोफखाना पोलिस स्टेशनचे कर्मचारी सहभागी झाले होते.

## मोटारसायकलची चोरी

नगर – माळीवाडा येथील जेनेरिक मेडिकल दुकानासमोर रस्त्याच्या कडेला हॅण्डेल लॉक करुन लावलेली हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल (क्र. एम एच १६ सी एल २०९०) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. या प्रकरणी शेखर राजु पवार (वय ३७, रा– समाज मंदीर शेजारी वाकोडी, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम ३०५ (ब) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## मोपेडची चोरी

नगर – तपोवन रोडवर ढवण वस्ती येथे घराच्या गेट समोर रस्त्याच्या कडेला हॅण्डेल लॉक करून लावलेली सुझुकी कंपनीची एक्सेस मोपेड (क्र. एम एच १६ डी ए ०१००) कोणीतरी अज्ञात चोरट्याने हॅण्डल लॉक तोडून चोरून नेली. याप्रकरणी वैशाली भारत वाडेकर (रा. ढवण वस्ती, तपोवन रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम ३०५ (ब) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# आरोग्य विभागाच्या संपूर्ण कामकाजाच्या चौकशीसाठी ३ सदस्यीय समिती स्थापन

## सात दिवसात अहवाल सादर करा : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांचे आदेश



आयुक्त यशवंत डांगे



डॉ. अनिल बोरगे

नगर – महानगरपालिकेच्या आरोग्य सेवांमध्ये सुधारणा न केल्यामुळे व परिणामी रँकिंग घसरल्यामुळे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉक्टर अनिल बोरगे यांच्यावर कारवाईचा बडगा उगारत त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. त्यानंतर आता आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी आरोग्य विभागाच्या संपूर्ण कामकाजाच्या चौकशीचे आदेश जारी केले आहेत. चौकशीसाठी तीन सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली आहे. सात दिवसात समितीला चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

डॉ. अनिल बोरगे यांना ऑगस्ट २०२४ मध्ये दोन वेळा नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. मुख्यत्वे महापालिकेच्या आरोग्य कार्यक्रमांचे प्रतिमाह असणारे रँकिंग हे राज्यातील महानगरपालिकांच्या शेवटच्या पाच गुणानुक्रमे आलेले आहे. या प्रकरणी त्यांना कारणे दाखवा नोटीसच्या अनुषंगाने सुधारणा करण्याबाबत निर्देश दिलेले होते. तथापि यामध्ये त्यांची कुठलीही प्रगती दिसून आलेली नाही. तसेच त्यांनी दिलेले खुलासे असमाधानकारक आहेत. त्यांच्या गैरवर्तनाबाबत वेळोवेळी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येवून व वाजवी संधी देवून देखील त्यांच्या वर्तनामध्ये कोणताही सकारात्मक बदल व कामकाजामध्ये सुधारणा झाली नाही. महाराष्ट्र शासनाकडील आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या महानगरपालिकांच्या रँकिंगमध्ये सुधारणा झालेली नाही. त्यांच्या विभागातील कर्मचाऱ्यांवर योग्य प्रकारे नियंत्रण ठेवणे ही विभाग प्रमुखाची जबाबदारी असताना ती पार पाडण्यात कसूर झालेली असल्याने व वारंवार होणाऱ्या अशा वर्तनामुळे कामकाजावर विपरित परिणाम होवून महानगरपालिकेची उद्दिष्ट पुर्ती झालेली नाही, असा ठपका ठेवत डॉ. बोरगे यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे.

आता आयुक्त यशवंत डांगे यांनी आरोग्य विभागाच्या संपूर्ण कामकाजाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यासाठी उपायुक्त विजयकुमार मुंडे, मुख्य लेखापरीक्षक विशाल पवार व प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर या अधिकाऱ्यांची चौकशी समिती नियुक्त केली आहे.

येत्या सात दिवसात चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश समितीला देण्यात आले आहेत.

# मंत्र्या संत्र्यांच्या पाणीपट्टीला कोट्यावधीची सूट सामान्यांना मात्र दुपटीची लुट हा कुठला न्याय

## ९ जानेवारीच्या सर्वसाधारण सभेत पाणी पट्टी वाढीचा निर्णय झालेला नसताना विषय आला कोठून : दीप चव्हाण



नगर – विळद घाटासह अनेक खाजगी आणि सार्वजनिक उपक्रमांसाठी मंत्र्या संत्र्यांच्या थकीत पाणीपट्ट्याना कोट्यावधी रुपयांची सूट देण्यात आली. आणि आता सामान्यांना दुपटीची लुट हा कुठला न्याय असा सवाल माजी नगराध्यक्ष काँग्रेस नेते दीप चव्हाण यांनी विचारला आहे. मुळा धरणापासून केडगाव इंडस्ट्रियल इस्टेट पर्यंत नगरच्या पाणीपुरवठा योजनेच्या पाईपलाईन वर विविध प्रकल्पात टॅब मारून पाणी उपसले जात आहे. असे दिसून येते. मध्यंतरी पालिकेने अधिकृत ठराव घेऊन विळद आणि इतर ठिकाणचे थकीत पाणीपट्टीचे प्रश्न मार्गी लावले.

तत्कालीन खासदार आणि विद्यमान मंत्र्यांच्या प्रकल्पांना भरघोस अशी कोट्यवधी रुपयांची सूट दिली. आता त्यांना म्हणे मीटरने मोजून पाणी दिले जात आहे. वसंत टेकडी पाण्याच्या टाकी पर्यंत विविध ग्रामपंचायती, रेल्वे स्टेशन सारख्या मोठमोठ्या संस्थांना या पद्धतीने पाणी दिले जाते. त्यांची कोट्यावधी रुपयांची थकबाकी थकीत आहे. त्यांना सूट दिली त्यावेळी प्रशासन आपली पाणी योजना तोट्यात आहे ही वस्तुस्थिती का धुडकावून लावत होते. या गोष्टींकडे पालिका प्रशासक, प्रशासन सोयीस्करपणे दुर्लक्ष करत आहे. आणि नगरकरांना विनाकारण वाढीव पाणीपट्टीचा बोजा चढवत आहे.

नगर शहरात मालमत्तांची संख्या एक लाख ३१ हजार आहे आणि अधिकृत नळ जोडांची संख्या ६५ हजारावर पोचली आहे. मग ही तफावत कशी? मनपा उत्पन्न आणि खर्चाचा ताळमेळ बसू शकत नाही. हजारो मालमत्ता धारकांनी बोगस नळजोड घेतले आहेत. गेल्या वर्षी मनपाला १२४ कोटी रुपयांचा तोटा झालेला आहे. ही तूट भरून काढण्यासाठी तसेच शहरात ही रस्त्याची कामे चालू आहेत त्यांना लोकवर्गणीतून दीडशे कोटी रुपयांच्या बदल्यात पालिकेची अंदाजे ४५ ते ५० कोटी रक्कम भरायची आहे ती देण्यासाठी पालिकेकडे पैसे नाहीत मग ते कुठून वसूल करायचे त्यासाठी हा वाढीव पाणीपट्टीचा टेकू प्रशासनाने शोधून काढला. याला स्थानिक लोकप्रतिनिधींचे प्रोत्साहन आणि पाठबळ असल्याशिवाय पालिका हे करू शकत नाही. एकीकडे मंत्री आणि लोकप्रतिनिधींना पाणीपट्टीत सूट आणि नागरिकांना वाढीव पाणीपट्टीची लुट हे कसे चालेल. नगर शहरात नियमित पाणीपुरवठा होत नाही. नगरकरांना एक दिवसाआड उपनगरात चार–पाच दिवसानंतर एकदा पाणी आणि केडगाव, कल्याण रोडवर आठ पंधरा दिवसातून एकदा असा पाणीपुरवठा विस्कळीत पद्धतीने केला जात आहे. ते देखील नगरकर सहन करत आहेत. मीटरने पाणीपुरवठा याबाबत अनेक घोषणा झाल्या पण प्रत्यक्षात ते अंमलबजावणी करू शकले नाहीत कारण मीटरने पाणीपुरवठा केल्यास पालिकेचे नुकसान आहे. हे प्रशासनाला चांगलेच ठाऊक आहे.

शहरात पाणीपुरवठा विभागाचे तीन तेरा वाजलेले आहेत. दोन अभियंत्यांच्या जीवावर हे काम चालते. उरलेले सर्व कर्मचारी निवृत्त झालेले आहेत. मेन फिटर रिटायर्ड आहेत. आता नवीन अभियंता घेतले आहेत ते कंत्राटी पद्धतीने आहेत ते पालिका कधी सोडून जातील हे सांगता येत नाही. पाणी पुरवठा विभागाचे मुख्य अभियंता एकदा ते रिटायर झाले की या विभागाचे तीन तेरा वाजलेच म्हणून समजा. नव्याने सुरू केलेली अमृत योजना त्या अगोदरची फेज टू ची पाणीपुरवठा योजना यासाठी तब्बल ३०० कोटी पेक्षा जास्त निधी खर्च झाला आहे. या योजनेत बांधलेल्या टाक्या रिकाम्याच आहेत. त्या खराब झाल्या आहेत. मोडकळीस देखील आल्या आहेत. या योजनेतून नगरकरांना फेज २ चे थेंब भर सुद्धा पाणी मिळालेले नाही फेज टू चे आणि अमृत योजनेचे नवीन कनेक्शन म्हणून जनतेकडून एका कनेक्शनचे साडेचार ते पाच हजार रुपये घेऊन यात स्थानिक ठेकेदाराचेच उखळ पांढरे झाले. यात पालिकेला एक रुपया सुद्धा मिळत नाही पण त्या नव्या पाईपलाईन मध्ये पाणी काही आले नाही.

सध्या जुनीच पाणी योजना शहरात कार्यान्वित आहे. त्यालाच फेज २ चे गोंडस नाव देतात. त्यावर पण पाणीपट्टी वाढीव दराने आकारण्याचा घाट घालण्यात आला आहे. त्याचा ठराव स्थायी समिती समोर ठेवण्यात आला. नंतर जनरल बोर्डात देण्यात आला. पण या सभेत या विषयात पाणी पट्टी दुपटीने वाढवावी याला सभेची मंजुरी नाही, तरी देखील पालिका प्रशासन त्याबद्दलच्या बातम्या छापून नगरकरांची वातावरण निर्मिती करत आहेत. जी नगरकरांची दिशाभूल आहे. यामध्ये अनेक जण मध्ये पडले त्यांनी पत्रके काढून हे चुकीचे आहे अन्याय कारक आहे. असे ते भासवत आहे. याद्वारे ते नगरकरांची सपशेल फसवणूक करत आहेत. २००३ ला पाणीपट्टी वाढली. आता पाणीपट्टी २१ वर्षांनी दुप्पट केल्याच्या खोट्या बातम्या पसरवण्यात आल्या. जर तेव्हापासून प्रत्येक वर्षी शंभर रुपयांनी पाणीपट्टी वाढवली असती तर आतापर्यंत चार हजाराच्या घरात गेली असती त्यावेळी नगरकरांनी आरडाओरड केली नसती. आता मनपा ला भविष्यात पाणीपट्टी वाढवायचीच असेल तर शंभर रुपये पाणीपट्टी वाढवावी आणि इथून पुढे दरवर्षी शंभर रुपयाने त्यात वाढ करावी हे योग्य आहे अन्यथा पाणीपट्टीत वाढ करू नये, असे आवाहन दीप चव्हाण यांनी केले आहे.

# भिंगारमध्ये युवकाला मारहाण करत जीवे मारण्याचा प्रयत्न


## जुन्या भांडणातून मारहाण, ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर : जुन्या भांडणाचा मनात राग धरून ८ जणांनी २९ वर्षीय युवकास मोटारसायकल आडवी घालून शिवीगाळ दमदाटी करील लोखंडी रॉड, लाकडी दांडक्याने व दगडाने बेदम मारहाण करून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना भिंगार परिसरात नगर पाथर्डी रोडवरील विजय लाईन्स चौकात जवळील एस के चाय क्लब जवळ घडली.

याबाबतची माहिती अशी की अक्षय संजय हांपे (वय २९, रा. सौरभ नगर, भिंगार ) हा १० जानेवारीला सकाळी १० वाजता जीम मधून घरी जात असताना बाबा ग्रुपचे अध्यक्ष प्रताप सुनील भिंगारदिवे (रा.पंपिंग स्टेशन, सावतानगर, भिंगार) शुभम उर्फ गुब्या शिंदे (रा. महेशनगर, भिंगार) करण भिंगारदिवे, प्रशांत उर्फ सोनू सुनील भिंगारदिवे, रुपेश शिंदे, अक्षय जावळे, विशाल उर्फ बजरंग ससाणे, ओमकार उर्फ भैय्या चांदणे (सर्व राहणार भिंगार) यांनी मोटारसायकलने येऊन अक्षय हांपे यास मोटारसायकल आडवी घालून शिवीगाळ करत लोखंडी रॉड, लाकडी दांडके व दगडाने बेदम मारहाण केली. या मारहाणीत अक्षय हांपे हा गंभीर जखमी झाला. त्यास घटनास्थळी असलेल्या नागरिकांनी औषधोपचाराकरिता रुग्णालयात दाखल केले. पुढील उपचारासाठी त्याला पुणे येथील खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे उपचार घेत असताना त्याने दिलेल्या जबाबावरुन भिंगार कॅम्प पोलिसांनी प्रताप भिंगारदिवे व त्याचे सात साथीदार यांच्या विरुद्ध खूनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश शिंदे हे करीत आहे.

# पाणीपट्टीत वाढ केल्यास जनआंदोलन उभे करणार

## माजी महापौर भगवान फुलसौंदर यांचा मनपाला इशारा



नगर – महानगरपालिका शहरातील सर्व नळ जोड धारकांची पाणी पटटी वाढविणार असल्याचे वृत्तपत्रातुन समजले आहे. वास्तविक नगर शहरामध्ये सद्य परिस्थितीत ४ ते ५ दिवसांना सावेडी, केडगाव, कल्याण रोड, बुरुडगाव रोड येथे पाणी मिळते. तेही असमाधानकारक आहे. फेज टु अमृत योजने अंतर्गत चालु असलेली पाणी पुरवठ्याची कामे अद्याप गेल्या १५ वर्षापासुन रखडलेली आहेत. महागाई, रस्ता पार्किंग, कचरा व इतर अन्य बाबींमुळे नगरकर आधीच त्रस्त झालेले आहेत. त्यात पाणीपट्टी वाढ करुन नगरकरांचे प्रशासनाने कंबरडे मोडु नये. पाणीपट्टी वाढ नगरकर कुठल्याही परिस्थीत मान्य करणार नाही.

महानगरपालिका ही सेवा देणारी संस्था असुन जर पाणीपट्टी वाढ केली तर शिवसेनेतर्फे नागरीकांसह मोठ्या प्रमाणात जन आंदोलन करण्यात येईल, असा इशारा माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी आयुक्तांना निवेदनाद्वारे दिला आहे.



बूथ हॉस्पिटल येथे सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# बूथ हॉस्पिटल येथे सर्व रोग निदान शिबीर

नगर – रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर आणि इव्हँजलीन बूथ हॉस्पिटल, एनसीडी सेस सिविल हॉस्पिटल आणि गरुड कॅन्सर हॉस्पिटल, केअरिंग फ्रेंड्स स्नेहालय, समता फाउंडेशन, एच व्ही देसाई नेत्र रुग्णालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ११ जानेवारी रोजी बूथ हॉस्पिटल येथे सर्व रोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. सर्व प्रकारच्या रुग्णांना मोफत तपासणी करून योग्य ते मार्गदर्शन करून मोफत औषधे देण्यात आली.


सकाळी ९ वाजता शहरातील सर्व डॉक्टर आणि त्यांची टीम शिबिराच्या ठिकाणी उपस्थित होते. हॉस्पिटलचे ॲडमिन मेजर देवदान कळकुंबे, रोटरी क्लबचे अध्यक्ष नितीन खाडे, सचिन सुभाष गर्जे यांनी उपस्थित डॉक्टरांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. डॉक्टर प्रकाश गरुड, ऑर्थो सर्जन डॉक्टर अरविंद गीते, त्वचारोग तज्ञ डॉक्टर वृषाली महांडुळे, रोटरी अध्यक्ष नितीन खाडे, डॉक्टर राहुल कांडेकर, रोटरीचे प्रमोद पारिख यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून शिबिराची सुरुवात झाली.

हॉस्पिटलच्या प्रवेशद्वारावर येणाऱ्या रुग्णांची नोंद करून केस पेपर देण्यात येत होता जवळपास ४५० ते ५०० रुग्णांनी याचा लाभ घेतला. महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे पदाधिकारी तसेच आरोग्य मित्र यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी रुग्णांना योजनाविषयी माहिती देण्यात आली. हॉस्पिटलचे सर्व डॉक्टर कर्मचारी नर्सिंग स्टाफ यांनी उत्तम नियोजन केले होते.

शिबिरातील डॉक्टरांचे आणि त्यांच्या समवेत असलेल्या टीमचे चहापाणी, नाश्ता, जेवण यांचे नियोजन केले होते.

# नागरिकांना रोज पूर्ण दाबाने पाणी द्या, मगच दरवाढ करा

## माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांची मनपा आयुक्तांकडे निवेदनातून मागणी



नगर – अहिल्यानगर महापालिकेने वार्षिक पाणीपट्टी दरामध्ये दुपटीने वाढ करण्याचा निर्णय घेतला असून सदरचा हा निर्णय अतिशय चुकीचा आहे. म.न.पा.मार्फत नगर शहरातील काही भागातील नागरिकांना एक दिवसाआड तर काही भागात चार ते पाच दिवसाला पाणी पुरवठा केला जातो. तसेच अतिशय कमी दाबाने नागरिकांना पाणी मिळते. तसेच अजुनही शहरात बऱ्याचशा भागामध्ये ७ ते ८ दिवसाने पाणी पुरवठा होतो. तसेच काही भागात पाणी पुरवठा होत नाही. बऱ्याचदा महापालिकेच्या जलवाहिन्या नादुरूस्त, लिकेज होतात त्यामुळे शहरात ३–४ दिवस पाणी येत नाही. अशामध्येच आपण घेतलेला पाणीपट्टी दरवाढीचा निर्णय हा शहरातील नागरिकांसाठी हितकारक नाही. पाणीपट्टी दरवाढ करण्यास आमची हरकत नाही पण आपल्यामार्फत जेव्हा नगर शहरातील नागरिकांना रोज पुर्ण दाबाने पाणी मिळेल त्याचवेळी पाणीपट्टी दरवाढ करण्यात यावी.

तूर्तास तरी पाणीपट्टी दरवाढीचा घेतलेला निर्णय त्वरीत रद्द करावा अशी मागणी माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी मनपा आयुक्तांकडे निवेदनातून मागणी केली.

